cmyk

अ
दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१९९ | शनिवार दि.१० ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय....

### मोदींच्या मित्राचे भारतावर वार!

एकीकडे 'मोदीट्रम्प मैत्री'चे ढोल, दुसरीकडे भारतीयांच्या भवितव्यावर घाव! अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारताचे मित्र असल्याचे राजकीय दावे केले जातात. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ट्रम्प यांच्या भेटींची छायाचित्रे दाखवली जातात, दोन्ही देशांमधील संबंधांचे गोडवे गायले जातात. पण जेव्हा अमेरिकेचे निर्णय भारतीय कंपन्यांच्या हितावर आणि भारतीय व्यावसायिकांच्या भविष्यावर परिणाम करू लागतात, तेव्हा या मैत्रीचा नेमका उपयोग काय? हस्तांदोलनातून भारताचे हित सुरक्षित होत असेल, तर मग भारतीय कर्मचाऱ्यांसाठी अनिश्चिततेचे ढग का? मोदीट्रम्प मैत्रीचा जयघोष करणाऱ्यांनी आता या प्रश्नाचे उत्तर द्यावे!

# केंद्रीय पथकाने पाहीली दुष्काळाची दाहकता

## शेतकऱ्यांनी मांडल्या व्यथा;पावसाचा खंड पिकांचे नुकसान; नद्या कोरड्या, विहिरी आटल्या

छ.सभाजीनगर–बीड–जालना ।

**मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथकाने गेवराई आणि बीड तालुक्यांतील विविध गावांना भेटी देऊन पिकांच्या नुकसानीचा आणि पाणीटंचाईचा आढावा घेतला. कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील या पथकाने शेतशिवारात जाऊन पिकांची स्थिती, जलस्त्रोतांची उपलब्धता आणि दुष्काळाचे परिणाम जाणून घेतले. पावसाच्या दीर्घ खंडामुळे शेतकऱ्यांनी केलेला खर्च आणि मेहनत वाया जाण्याची परिस्थिती या दौऱ्यात समोर आली.**

पथकात महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, नीती आयोगाचे सल्लागार डॉ. जसपाल सिंग आणि पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन अधिकारी डॉ. साक्षी भदौरिया यांचा समावेश होता. या दौऱ्यात राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे आणि गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित उपस्थित होते.पथकाने गेवराई तालुक्यातील जातेगाव फाटा परिसरातील शेतांची पाहणी करून दौऱ्याला सुरुवात केली. येथील शेतशिवारातील पिकांची सद्यस्थिती जाणून घेत पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधला.गेवराई तालुक्यातील अर्धमसला आणि रानमळा परिसरात पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांच्या नुकसानीची माहिती घेतली. अर्धमसला येथील शेतकरी सुरेश बाबुराव नरवाडे यांच्या गट क्रमांक ९४ मधील १.४० हेक्टर क्षेत्रावरील कपाशी पिकाची, तर संतोष बाबुराव नरवाडे यांच्या गट क्रमांक ३३१ मधील ०.६७ हेक्टर क्षेत्रावरील ऊस पिकाची पाहणी करण्यात आली. गेवराई येथील शेतकरी मदन रामभाऊ मोटे यांच्या ०.८० हेक्टर क्षेत्रावरील कपाशी पिकाच्या नुकसानीचीही माहिती पथकाने घेतली.तुतीच्या पिकाची पाहणी करताना पाण्याअभावी वाढ खुंटल्याचे आणि अपेक्षित उत्पादन मिळण्यास अडचणी निर्माण झाल्याचे निर्दशनास आले. ▶▶ पान २ वर



पावसाने मोठी ओढ दिल्याने शेतीचे नुकसान झाले असून, चारा आणि पाण्याचा प्रश्ना संदर्भात शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या आहेत. शेतकरी हिताला प्राधान्य दिलेजाणारअसून, दुष्काळी परिस्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा आणि आवश्यक उपाययोजनांसाठी केंद्र सरकारला अहवाल सादर करण्यात येणार आहे.

**मुक्तानंद अग्रवाल, केंद्रीय पथकाचे प्रमुख, दिल्ली**

### सोयाबीन पिकाची पाहणी

पथकाने बीड तालुक्यातील पारगाव जप्ती येथे शेतकरी सतीश सखाराम देवळे यांच्या गट क्रमांक ५० मधील ०.४० हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन पिकाची प्रत्यक्ष पाहणी केली. पावसाअभावी पिकाची झालेली दुरवस्था पाहून पथकाने शेतीतील नुकसानीची स्थिती जाणून घेतली.सोयाबीन पिकाच्या उत्पादनाच्या अपेक्षेवर पावसाच्या खंडाचा परिणाम झाल्याचे या पाहणीतून दिसून आले.

### सिंदफणा नदीपात्र कोरडे

बीड तालुक्यातील नांदुरा हवेली येथे पथकाने सिंदफणा नदीच्या कोरड्या पात्राची पाहणी करून परिसरातील पाणीटंचाईचा आढावा घेतला. नदीतील घटलेला जलसाठा, सिंचनावरील परिणाम आणि भविष्यात पाणी उपलब्धतेसाठी आवश्यक उपाययोजनांबाबत यावेळी चर्चा झाली. माजलगाव धरणातील पाणीसाठा सरासरीच्या २६ टक्क्यांपर्यंत घसरल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### केंद्रीय पथक आज या गावात

या दोन दिवसीय दुष्काळ पाहणी दौऱ्यात पथकाकडून शनिवारी बीड तालुक्यातील मांजरसुंबा, खंडाळा, वैद्यकीन्ही, सोनगाव आणि पाटोदा येथे पाहणी करणार तर पाहणी दौऱ्यानंतर जिल्हाधिकारी बीड यांच्या समवेत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृह येथे आढावा घेणार.

## थोडक्यात...

### नोएडा विमानतळाला 'नरेंद्र मोदी यांचे नाव

जेवर : उत्तर प्रदेशातील जेवर येथे उभारण्यात आलेल्या नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नाव बदलून 'नरेंद्र मोदी आंतरराष्ट्रीय विमानतळ' करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केली आहे. गौतम बुद्ध नगर जिल्ह्यातील जेवर येथे असलेला हा विमानतळ राष्ट्रीय राजधानी क्षेत्रासाठी दुसरा आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील प्रवाशांचा आणि हवाई वाहतुकीचा ताण कमी करणे हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे.राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील हे दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते याच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन झाले होते. भविष्यात अनेक धावपट्टयांचा विस्तार करून २०५० पर्यंत विमानतळाची क्षमता वर्षाला सुमारे ७ कोटी प्रवाशांपर्यंत नेण्याचे नियोजन आहे.

### बस–ट्रकच्या धडकेत ३२ बीएसएफ जवान जखमी

बारपेटा : आसाममधील बारपेटा जिल्ह्यातील हाउली येथे राष्ट्रीय महामार्ग २७ वर बीएसएफ जवानांना घेऊन जाणा–या बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात बीएसएफचे ३२ जवान जखमी झाले असून, बस चालकाचा जागीच मृत्यू झाला. जखमींपैकी १४ जवानांची प्रकृती गंभीर असून एकाची प्रकृती चिंताजनक आहे. गंभीर जखमींना बारपेटा मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.निवडणूक ड्युटीवरून परतत असताना जवानांची बस ट्रकच्या मागील भागावर धडकली. ही बस धुब्रीच्या दिशेने जात असताना ही धडक झाली. जखमींपैकी एकाची प्रकृती चिंताजनक असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. बसचालकाचा जागीच मृत्यू झाला.

# राज्यात आता ३०१ तालुके दुष्काळी

मुंबई–नागपूर । प्रतिनिधी

राज्य सरकारने राज्यात दुष्काळ जाहीर केला आहे. तसेच नुकसानीची माहिती घेण्यासाठी पंचनामेही सुरू करण्यात आले आहेत. त्यामुळे बळीराजांना लवकरच आर्थिक मदत मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सरकारने राज्यातील ७५ टक्के तालुक्यात दुष्काळ जाहीर केला होता. यातून काही तालुके सुटले होते. त्यामुळे शेतक–यांनी नाराजी व्यक्त केली होती. विरोधी पक्षाकडूनही सरकारवर टीका करण्यात आली होती. त्यानंतर सरकारने अखेर ३६ तालुक्यांचा दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश केला असून आता राज्यातील ३०१ तालुके दुष्काळी असल्याची नोंद करण्यात आली असल्याची ▶▶ पान २ वर

### सरकारच्या उपाययोजना

सरकारने दुष्काळ निवारणासाठी उपाययोजना केल्या आहेत. जनावरांच्या चारा आणि पाण्याची व्यवस्था केली आहे. सरकारने पिण्यासाठी आणि जनावरांसाठी पाणी राखीव ठेवले आहे. उरलेले पाणी उद्योग आणि इतर गोष्टींना देण्यात येणार आहे. दुसरीकडे राज्यात केंद्राचे पथक आले आहे. या पथकाकडून नुकसानीची माहिती घेऊन अहवाल तयार केला जात आहे. हा अहवाल केंद्र सरकारकडे गेल्यावर शेतक–यांना आर्थिक मदत मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

# मोठा निर्णय; शाळाबंद'चा निर्णय सर्वेक्षणानंतरच!



मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील सरकारी आणि अनुदानित शाळा बंद, विलीन किंवा पुनर्रचित करण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा परिणाम तपासण्यासाठी राज्य सरकार सर्वंकष सर्वेक्षण करणार आहे. शाळेपासून पर्यायी शाळेचे अंतर, प्रवासाचा वेळ, सुरक्षित वाहतूक, भौगोलिक परिस्थिती, मुलींची सुरक्षितता आणि स्थानिक सामाजिक परिस्थितीचा विचार केला जाणार आहे. हे सर्वेक्षण तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे. आझाद मैदानातील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला आहे.

शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल ▶▶ पान २ वर

### '...म्हणून शाळा बंद नको'

विद्यार्थीसंख्या कमी आहे म्हणून सरकारी किंवा अनुदानित शाळा बंद करणे योग्य नाही. शाळा बंद, विलीन किंवा पुनर्रचित करण्यापूर्वी विद्यार्थ्यांना शिक्षण सहज उपलब्ध राहील का, याचा विचार झाला पाहिजे, असे मंचाचे संपत देसाई यांनी सांगितले. पुनर्रचनेमुळे कोणताही विद्यार्थी शाळाबाह्य होऊ नये किंवा त्याची उपस्थिती कमी होऊ नये, यासाठी विद्यार्थीनिहाय व्यवस्था करण्याचे आश्वासनही सरकारने दिले आहे.

# नंदीग्राम पोटनिवडणुकीत भाजपने राखला गड

नवीदिल्ली । वृतसंस्था

पश्चिम बंगालमधील नंदीग्राम आणि रेजीनगर विधानसभा पोटनिवडणुकीच्या निकाल जाहीर झाला आहे. या दोन्ही मतदारसंघात भाजपने मोठा विजय मिळवला आहे. हसीरानी रथ यांनी पोटनिवडणुकीत प्रचंड मताधिक्याने विजय मिळवला आहे. हसीरानी रथ यांच्या विरोधात कॉंग्रेसचे उम्मेदवार मिलन प्रधान होते. रथ यांनी मोठ्या फरकाने त्यांचा पराभव केला. तर रेजिनगरमध्ये भाजपचे उमेदवार शंकरराव सरकार यांनी मोठा विजय मिळवला आहे. त्यांच्या विरोधात आम जनता उन्नयम पार्टीचे गुलाम नबी आझाद होते. तर ममता बॅनर्जींना तृणमूल कॉंग्रेसला मोठा धक्का बसला आहे.हसीरानी रथ यांना एकूण १,६४,४२७ मते मिळाली. तर त्यांच्या विरोधात कॉंग्रेसचे उमेदवार मिलन प्रधान होते. त्यांना ४१,६७४ मते मिळाली. रथ यांनी ▶▶ पान २ वर

# पदावर नाहीत मग राजीनामा कसा घेणार?–मुख्यमंत्री

पालघर । प्रतिनिधी

एमपीएससी तर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकारांमुळं महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. यासंदर्भात पत्रकारांनी प्रश्न विचारण्यात आला असता देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. विद्यार्थ्यांना कळवण्यात आलं होतं की ते ज्या अध्यक्षांचा राजीनामा मागत आहेत, ज्यावेळी पेपरफूट झाली तेव्हा ते जॉईन झालेले नव्हते.



पेपरफूट झाल्यानंतर ते जॉईन झाले तर मागच्या काळाकरता त्यांचा राजीनामा आपल्याला कसा थेट घेता येईल, असा सवाल देवेंद्र फडणवीस यांनी केला.

मुख्यमंत्री याविषयावर बोलताना पुढे म्हणाले, आम्ही सांगितलं की न्यायाधीशांकडून न्यायालयीन चौकशी करायला तयार आहोत. त्या चौकशीत हे अध्यक्ष असतील, जुने कोणी असतील,अजून कोणी अधिकारी असतील,जे जे दोषी असतील त्या सर्वांवर आम्ही कारवाई कारवाई करायला तयार आहोत. प्रश्न एवढाच आहे की जे त्या काळात नव्हतेच त्यांचा राजीनामा कोणत्या परिस्थितीत घ्यायचा आणि महत्त्वाचं म्हणजे पहिल्यांदा आपण लक्षात घ्यावं, राजीनामा घेण्याचा अधिकार शासनाला नाही. हे त्यांना माहिती आहे. समजा त्यांना काढायचं झालं तरी तो अधिकार राष्ट्रपतींना ▶▶ पान २ वर

# पुणे पदवीधरमधून शिंदे सेनेचे मंगेश चिवटेंची माघार

पुणे । प्रतिनिधी

विधानपरिषदेच्या पुणे शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघात उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटची दिवशी नाट्यमय घडामोडी घडल्या आहेत. या दोन्ही मतदारसंघातील महायुतीच्या प्रमुख बंडखोर उमेदवारांनी माघार घेतल्याने भाजपच्या उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपच्या कौस्तुभ गावडे यांच्याविरोधात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मंगेश चिवटे यांनी अर्ज दाखल केला होता. मात्र या दोन्ही उमेदवारांची बंडखोरी रोखण्यात भाजपला यश आलं असून शेवटच्या दिवशी चिवटे यांच्याकडून अर्ज मागे घेण्यात आला आहे.

''हसन मुश्रीफ आणि विनय कोरे यांच्यासोबत झालेल्या चर्चेनंतर मी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. मला निवडणूक लढवण्यासाठी कार्यकर्त्यांचा दबाव होता. मात्र आमचे नेते हसन मुश्रीफ यांनी मला महायुतीची भूमिका समजावून सांगितली. त्यामुळे आज ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०९ ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३५.०० क्विंटल | २,७०१ | ३,४०० | ३,०४३ |
| ज्वारी/हायब्रिड: ११७.०० क्विंटल | ३,७०१ | ५,९०० | ४,८२२ |
| मका/लोकल: १.०० क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : १.०० क्विंटल | १०,००० | १०,००० | १०,००० |
| उडीद : १०.५० क्विंटल | ९,३०१ | ९,७२५ | ९,५०५ |
| बाजरी: २७.५० क्विंटल | २,६०० | २,८७२ | २,७७७ |
| मुग: ०.५० क्विंटल | ९,७०० | ९,७०० | ९,७०० |
| सोयाबीन: ११७.५० क्विंटल | ५,७५१ | ७,००० | ६,६१७ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ६,७१० | ६,७१० | ६,७१० |

# राज ठाकरे मुख्यमंत्र्यांशी बोलले

● विद्यार्थी आंदोलनाबाबत; लवकरच चांगली बातमी

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षा प्रक्रियेविरोधात एस. एम. जोशी पुलावर मागील काही दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही नुकतीच भेट दिली होती. या भेटीनंतर आता विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सविस्तर चर्चा झाली असून लवकरच एमपीएससी विद्यार्थ्यांना आनंदाची बातमी मिळेल, तोपर्यंत विद्यार्थ्यांनी संयम राखावा, असं आवाहन राज ठाकरे यांनी केलं आहे.

मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या चर्चेची माहिती देताना राज ठाकरे यांनी म्हटलं आहे की, ''५ ऑक्टोबर रोजी मी जेव्हा पुण्यात एमपीएससी आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेतली तेव्हा मी तुमचं म्हणणं, तुमच्या रास्त अपेक्षा याबद्दल मुख्यमंत्र्यांशी बोलेन असं आश्वस्त केलं होतं. स्वतःचा राहता जिल्हा, तालुका, आपलं घर तसेच आपल्या कुटुंबाला सोडून नोकरीसाठी राब राब राबणाऱ्या ▶▶ पान २ वर

# फडणवीस निवडणूक आयोगाचे वकील

पुणे । प्रतिनिधी

एसआयआर प्रकरणी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात रोष वाढत आहेत. त्यांच्यावर चौफर टीका होत असून त्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी होत आहे. पण निवडणूक आयोगावर आरोप होत असताना भाजपचे नेते उत्तर देत आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवडणूक आयोगाचा वकील म्हणून नेमले आहे असा टोला शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी लगावला आहे.



तसेच राज्यात ताबडतोब निवडणुका लावल्या तर मिंधे गट आणि भाजप इथे औषधलाही राहणार नाही असेही संजय राऊत म्हणाले. ▶▶ पान २ वर

# ..तर महिलेने जीवन संपवल्यास तो गुन्हा नाही




नवी दिल्ली । वृतसंस्था

**कोणत्याही व्यक्तीने लग्नास नकार दिल्यानंतर जरी संबंधित व्यक्तीने आत्महत्या केली, तरीही केवळ या कारणावरून तो आयपीसी कलम ३०६ नुसार आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याचा गुन्हा ठरू शकत नाही, असा अत्यंत महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने एका महिलेच्या आत्महत्या प्रकरणात ६ आरोपींविरोधातील फौजदारी व अपराधिक कारवाई पूर्णपणे रद्द केली आहे आणि त्यांना या प्रकरणी दोषमुक्त केले आहे.**

न्यायमूर्ती जे. बी. पारदीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी करताना स्पष्ट केले की, मानवी मन आणि लोक वेगवेगळ्या परिस्थितीत ▶▶ पान २ वर

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352



महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
● डोकेदुखी / अती चिंता व काळजी
➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता–पायात मुंग्या येणे)
● झोपेच्या समस्या
➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
● व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
● बालकांच्या समस्या :
➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
● स्मृती भंग (विसरभोळेपणा)
● लैंगिक समस्या
➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
● स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या



नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
सौ.संध्या श्रीराम टेकाळे(शिंदे)
मुख्याध्यापिका मो.९४२१३४८४७४
श्रीराम टेकाळे
(पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड)
सामाजिक कार्यकर्ते मो.9075387638
सौ.डॉ.जयश्री रोहन मालुरे(टेकाळे)
M.B.B.S. मो.७७४३९९०९८८
विठाई हॉस्पिटल,कळंब
डॉ.रोहन मालुरे
M.B.B.S.,MD,Medicine
विठाई हॉस्पिटल,कळंब मो.९८६०५६०५५७

cmyk

## अग्रलेख

# मोदींच्या मित्राचे भारतावर वार!

एकीकडे 'मोदीट्रम्प मैत्री'चे ढोल, दुसरीकडे भारतीयांच्या भवितव्यावर घाव! अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारताचे मित्र असल्याचे राजकीय दावे केले जातात. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ट्रम्प यांच्या भेटींची छायाचित्रे दाखवली जातात, दोन्ही देशांमधील संबंधांचे गोडवे गायले जातात. पण जेव्हा अमेरिकेचे निर्णय भारतीय कंपन्यांच्या हितावर आणि भारतीय व्यावसायिकांच्या भविष्यावर परिणाम करू लागतात, तेव्हा या मैत्रीचा नेमका उपयोग काय? हस्तांदोलनातून भारताचे हित सुरक्षित होत असेल, तर मग भारतीय कर्मचाऱ्यांसाठी अनिश्चिततेचे ढग का? मोदीट्रम्प मैत्रीचा जयघोष करणाऱ्यांनी आता या प्रश्नाचे उत्तर द्यावे!

८ ऑक्टोबर २०२६ रोजी अमेरिकेच्या प्रशासनाने मायक्रोसॉफ्ट, ॲडोबी, कॉग्निझंट, इन्फोसिस, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस अर्थात टीसीएस, विप्रो, एचसीएलटेक आणि कॅपजेमिनी या आठ कंपन्यांच्या रोजगार प्रमाणपत्र अर्जांशी संबंधित पीईआरएम प्रक्रियेला निलंबित केले. या कारवाईमुळे संबंधित कंपन्यांच्या नवीन आणि प्रलंबित अर्जांवर अडथळा निर्माण झाला आहे. अमेरिकेने यामागे स्थानिक कर्मचाऱ्यांच्या रोजगाराचे संरक्षण आणि संभाव्य गैरव्यवहार रोखण्याची भूमिका मांडली आहे. मात्र, आरोप म्हणजे दोष सिद्ध होणे नव्हे. या कंपन्यांच्या बाबतीत प्रत्यक्षात काय निष्पन्न होते, हे स्वतंत्रपणे तपासले गेले पाहिजे. पण या निर्णयाचे परिणाम भोगण्याची वेळ आली, तर भारतीय कर्मचाऱ्यांच्या चिंता कोण दूर करणार? इथे एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. अमेरिकेने सर्व भारतीयांचे ग्रीन कार्ड बंद केलेले नाही आणि एच–१बी व्हिसाही सरसकट रद्द केलेला नाही. एच–१बी हा कुशल नोकरीसाठीचा तात्पुरता व्हिसा आहे, तर ग्रीन कार्ड कायमस्वरूपी वास्तव्याचा दर्जा देते. पीईआरएम ही रोजगाराच्या आधारे ग्रीन कार्ड मिळवण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाची पायरी आहे. त्यामुळे या आठ कंपन्यांमार्फत ग्रीन कार्ड मिळवण्याच्या प्रक्रियेत असलेल्या पात्र कर्मचाऱ्यांना विलंब आणि अनिश्चिततेचा सामना करावा लागू शकतो. ज्यांनी अमेरिकेत वर्षानुवर्षे मेहनत केली, घर घेतले, मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था केली आणि कायमस्वरूपी स्थायिक होण्याची स्वप्ने पाहिली, त्यांच्या भवितव्यावर या निर्णयाचा परिणाम होण्याची शक्यता आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याची परिस्थिती वेगळी असली, तरी निर्माण झालेली अनिश्चितता दुर्लक्षित करता येणार नाही. आता प्रश्न ट्रम्प यांच्या धोरणाचा जितका आहे, तितकाच मोदी सरकारच्या राजनैतिक रणनीतीचाही आहे. अमेरिकेला स्वतःच्या नागरिकांच्या रोजगाराचे संरक्षण करायचे आहे; भारताला आपल्या नागरिकांच्या संधींचे संरक्षण करण्याचा अधिकार आणि जबाबदारी आहे. मग भारतीय हितसंबंधांचा मुद्दा अमेरिकेसमोर किती ठामपणे मांडला जातो आहे? भारतीय कंपन्यांवर परिणाम करणाऱ्या निर्णयांबाबत स्पष्टता मिळवण्यासाठी कोणती चर्चा सुरू आहे? प्रभावित कर्मचाऱ्यांना कायदेशीर मार्गदर्शन आणि पर्यायी पर्यायांची माहिती मिळावी यासाठी काय केले जात आहे? केवळ मैत्रीचे दावे करून या प्रश्नांची उत्तरे मिळणार नाहीत. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने ९ ऑक्टोबर २०२६ रोजी या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली. पीईआरएम आणि एच–१बी व्हिसा या वेगवेगळ्या व्यवस्था असल्याचे स्पष्ट करत भारताने भारतीय कुशल मनुष्यबळाच्या योगदानावर भर दिला. त्यामुळे सरकार गप्प बसले आहे, असा सरसकट आरोप करणे योग्य नाही. पण अधिकृत प्रतिक्रिया आणि प्रत्यक्ष परिणामकारक कृती यांत फरक असतो. आता सरकारने अमेरिकेशी सातत्यपूर्ण संवाद साधून प्रभावित कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर स्पष्टता मिळवावी, भारतीय उद्योगाच्या हिताचे संरक्षण करावे आणि आवश्यकतेनुसार कायदेशीर व राजनैतिक मार्गांचा वापर करावा, अशी अपेक्षा रास्त आहे. मोदींचे मित्र ट्रम्प अमेरिकेचे हित पाहणारच; पण भारताचे हित कोण पाहणार? हा प्रश्न राजकीय घोषणांपेक्षा मोठा आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक देश स्वतःच्या हिताला प्राधान्य देतो. त्यामुळे ट्रम्प भारताचे मित्र आहेत म्हणून अमेरिकेचे प्रत्येक धोरण भारताच्या फायद्याचे असेल, असे गृहीत धरणे भाबडेपणाचे ठरेल. मैत्री महत्त्वाची, पण राष्ट्रीय हित त्याहून महत्त्वाचे! दोन्ही नेत्यांमधील संबंधांचा खरा फायदा भारतीय उद्योगांना, कर्मचाऱ्यांना आणि सामान्य नागरिकांना मिळतो का, याची तपासणी होणे आवश्यक आहे. भारताने अमेरिकेशी संबंध तोडण्याची गरज नाही; गरज आहे ती या संबंधांमध्ये भारतीय हितसंबंध ठामपणे मांडण्याची. पर्यायी जागतिक बाजारपेठा विकसित करणे, देशांतर्गत रोजगार वाढवणे, भारतीय तंत्रज्ञान उद्योगाला अधिक सक्षम करणे आणि परदेशात काम करणाऱ्या भारतीयांना योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. अमेरिकेच्या प्रत्येक निर्णयानंतर भारताने बचावात्मक भूमिका घेण्याऐवजी दीर्घकालीन रणनीती आखली पाहिजे. मैत्रीचे फोटो देशाचे भविष्य सुरक्षित करत नाहीत; ठोस धोरणे आणि परिणामकारक कृती करतात. ट्रम्प यांच्या निर्णयांमुळे भारतीयांच्या संधींवर परिणाम होण्याची शक्यता असेल, तर मोदी सरकारने त्यावर स्पष्ट भूमिका घ्यावी आणि पुढील पावले जनतेसमोर मांडावीत. कारण प्रश्न केवळ ग्रीन कार्डचा नाही; प्रश्न आहे भारतीयांच्या मेहनतीचा, त्यांच्या कुटुंबांच्या भविष्याचा आणि भारताच्या जागतिक आर्थिक हिताचा. मोदीट्रम्प मैत्रीची खरी कसोटी घोषणांत नाही, तर या हितांचे संरक्षण किती प्रभावीपणे होते, यात आहे.

# सुखदेव दळवी यांचे निधन



**बीड । प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील खुंडरस येथील ज्येष्ठ नागरिक सुखदेव केरबा दळवी (वय ७४) यांचे शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता खुंडरस येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.**

सुखदेव दळवी हे गावातील ज्येष्ठ नागरिक म्हणून परिचित होते. मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांनी गावात आपुलकीचे संबंध जपले होते. त्यांच्या निधनाने खुंडरस परिसरात शोककळा पसरली असून, विविध स्तरांतून दुःख व्यक्त केले जात आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. बीड येथील युवा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाई) कार्यकर्ते भाऊसाहेब दळवी यांचे ते वडील होत. सुखदेव दळवी यांचा सावडण्याचा व जलदान विधी रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी खुंडरस येथील त्यांच्या राहत्या घरी होणार आहे.

# दुष्काळ निवारण्यासाठी राज्याची केंद्राकडे ५३०० कोटींची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील दुष्काळाची तीव्रता, पिकांचे नुकसान आणि पाणी–चारा टंचाईची वस्तुस्थिती तपासण्यासाठी केंद्र सरकारची तीन पथके महाराष्ट्रात दाखल झाली आहेत. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केल्यानंतर आता प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, केंद्राच्या निकषांनुसार दुष्काळ घोषित करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली, पिकांचे किती नुकसान झाले आणि शेतकऱ्यांना मदतीची किती गरज आहे, याची तपासणी केली जात आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन दुष्काळी मदतीसाठी ५३०० कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली आहे. त्यामुळे केंद्रीय पथकाच्या पाहणीकडे आणि त्यानंतर मिळणाऱ्या मदतीच्या निर्णयाकडे राज्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.**

राज्याचे मुख्य सचिव राजेश अगरवाल यांनी केंद्रीय पथकासमोर महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची प्राथमिक माहिती सादर केली. सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत दुष्काळ जाहीर करण्यासाठी वापरण्यात आलेले निकष, पीकस्थिती, पाणीसाठा, चारा उपलब्धता, पीक पंचनामे आणि विभागनिहाय परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. केंद्र सरकारने निश्चित केलेल्या निकषांनुसारच दुष्काळ घोषित करण्याची कार्यवाही झाली आहे का, याचीही तपासणी करण्यात आली. या बैठकीला कृषी, मदत व पुनर्वसन, पाणीपुरवठा, दुग्धविकास व पशुसंवर्धन, सहकार, वित्त आणि नियोजन विभागांसह अन्य संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कृषी विभागाचे सहसचिव मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील पथकात सांख्यिकी विभागाचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, नीती आयोगाचे सल्लागार डॉ. जसपाल सिंग आणि पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन विकास अधिकारी डॉ. साक्षी भदोरिया यांचा समावेश आहे. राज्यातील आठ कृषी विभागांतील २६५ दुष्काळी तालुक्यांमध्ये एकूण ३२ हजार ९२७ गावांचा समावेश आहे. यापैकी २६ हजार १३१ गावांतील पिकांचे पंचनामे करण्यात आले आहेत. दुष्काळी तालुक्यांतील सुमारे ६० टक्के क्षेत्रावरील पंचनामे पूर्ण झाले असून, उर्वरित क्षेत्रातील कामालाही गती देण्यात येत आहे. लातूर, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगर विभागांत पंचनाम्यांचे काम वेगाने सुरू असल्याची माहिती केंद्रीय पथकाला देण्यात आली. मराठवाडा आणि विदर्भासह पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये दुष्काळाचे परिणाम गंभीर स्वरूपात जाणवत आहेत. पावसाची कमतरता, पिकांची स्थिती, संभाव्य उत्पादनातील घट, पाण्याची उपलब्धता आणि पशुधनासाठी चाऱ्याची परिस्थिती या बाबींचा मदतीचे स्वरूप निश्चित करताना विचार केला जाणार आहे. केंद्रीय पथकाच्या पाहणीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने संबंधित यंत्रणांना जिल्हा, तालुका आणि गावनिहाय दुष्काळग्रस्त परिस्थितीची सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. पीक सर्वेक्षणाची आकडेवारी, पीक कापणी प्रयोगांतून मिळालेल्या उत्पादनाची माहिती, पीक विमा नोंदणी आणि दाव्यांची सद्यःस्थिती तसेच पावसाच्या नोंदी पथकासमोर सादर केल्या जाणार आहेत. याशिवाय भूजलपातळी, उपलब्ध जलसाठे, पिण्याच्या पाण्याची टंचाई, चारा उपलब्धता, पशुधनाच्या संरक्षणासाठी केलेल्या उपाययोजना आणि रोजगार हमी योजनेअंतर्गत उपलब्ध रोजगाराची स्थिती तपासली जाणार आहे. केवळ कागदोपत्री आकडेवारीवर नव्हे, तर प्रत्यक्ष परिस्थितीच्या आधारे दुष्काळाची तीव्रता समजून घेण्यावर या पाहणीचा भर असेल.

# एसटीच्या अतिरिक्त जमिनींच्या व्यावसायिक विकासाला वेग

## पीपीपी तत्त्वावर ९८ वर्षांपर्यंत भाडेपट्टा; ८५० ठिकाणांवरील ३५०० एकरांहून अधिक जमिनीतून उत्पन्न वाढविण्याचे उद्दिष्ट

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) अतिरिक्त जमिनींचा सार्वजनिक–खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर व्यावसायिक विकास करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार ४९+४९ वर्षे, अशा एकूण ९८ वर्षांपर्यंत भाडेपट्टा करता येणार आहे. या निर्णयामुळे एसटी महामंडळाला दीर्घकालीन उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध होणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.**

### एसटीच्या आर्थिक सक्षमीकरणावर भर

एसटीच्या जमिनी हा महामंडळाचा मौल्यवान ठेवा असून, त्यांचा विकास पारदर्शक निविदा प्रक्रिया आणि योग्य व्यावसायिक नियोजनातून करण्यात येणार आहे. या मालमत्तांमधून मिळणारे उत्पन्न एसटीच्या प्रवासी सेवा आणि सुविधांच्या बळकटीकरणासाठी वापरण्यात येईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.

राज्यभरातील सुमारे ८५० ठिकाणी एसटी महामंडळाकडे ३५०० एकरांहून अधिक जमीन उपलब्ध आहे. या जमिनींचा व्यापारी, निवासी, औद्योगिक आणि अन्य व्यावसायिक कारणांसाठी नियोजनबद्ध विकास करण्यात येणार आहे. त्यातून आगाऊ प्रीमियमसह नियमित उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. या प्रक्रियेसाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविणे बंधनकारक असून, प्रकल्पाच्या निविदा व सवलत करारनाम्यासाठी समितीची मान्यता घेतली जाणार आहे. तसेच प्रत्येक प्रकल्पाच्या अंतिम निविदेला मुख्यमंत्री स्तरावर मान्यता घेणे आवश्यक राहणार आहे. सुबोधकुमार समितीने एसटीच्या आर्थिक स्थितीचा विचार करून आगाऊ प्रीमियमसह दीर्घकालीन भाडेपट्टा मॉडेलची शिफारस केली होती. त्यानुसार शासनाने ९८ वर्षांपर्यंत भाडेपट्ट्यास मान्यता दिली आहे.

# विद्यार्थ्यांचे अपार आयडी आणि आधार'चे परळी तालुक्याचे काम सर्वात मागे; गटशिक्षणाधिकाऱ्यावर कारवाई होणार

**बीड । प्रतिनिधी**

**यु–डायस पल्स २०२६ विद्यार्थ्यांचे अपार आयडी आणि आधार अंतर्गत तालुक्याचे काम सर्वात मागे असलेल्या तालुका गट शिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी आणि केंद्रप्रमुखाची बैठक बीड जिल्हा परिषदेचे दस्तुरखुद्द मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शुक्रवारी घेतली. या बैठकीमध्ये सर्वात काम कमी असलेले असलेल्या परळी आणि पाटोदा तालुक्याच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना सीईओ जितीन रहमान यांनी धारेवर धरले. परळीच्या गट शिक्षणाधिकारी यांना नोटीस देऊन वेतनवाढ रोखण्याची करण्याचे आदेश दिले आहेत.**

या संदर्भात माहिती अशी की बीड जिल्ह्यात युडायस प्लस २०२६ अंतर्गत सर्व शाळांतील विद्यार्थ्यांचे शाळनिहाय आपार आयडी जनरेट करणे, आधार व्हेरिफिकेशन, आदी कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील सर्व शाळांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी आणि भौतिक सुविधा संदर्भात राज्यस्तरावरून नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आयएएस अधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी दोन वेळा बीड जिल्ह्यातील शाळा भेटीसह शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विहित कालावधीत सर्व कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. बीड जिल्ह्यात अकरा तालुक्यांपैकी सर्वात मागे परळी तालुका आहे तर त्या खालोखाल माजलगाव आणि अंबाजोगाई यांचे काम मागे आहे. ज्या केंद्राचे काम कमी आहे त्या केंद्राचे केंद्रप्रमुख संबंधित विस्तार अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांची बैठक शुक्रवार दि.९ सप्टेंबर २०२६ रोजी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर तालुक्याची गटशिक्षणाधिकारी आणि संबंधितावर कारवाई करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत.

## पान १ वरून...

पान १ वरून...

### केंद्रीय पथकाने पाहीली

पावसातील दीर्घ खंडामुळे कपाशी, ऊस आणि तुती उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. पिकांसाठी केलेला हजारो रुपयांचा खर्च वाया जाण्याची शक्यता आहे. त्यातच करपलेल्या पिकांचा जनावरांसाठी चारा म्हणूनही उपयोग होत नसल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.शेतात घेतलेली मेहनत, पिकांसाठी केलेला खर्च आणि भरघोस उत्पन्नाची अपेक्षा यांवर पावसाच्या खंडामुळे पाणी फेरले गेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. गेवराई येथील शेतकरी मदन रामभाऊ मोटे यांच्या तूर आणि कपाशी पिकांची पाहणी करून पथकाने जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून पाऊस नसल्यामुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतली. विहिरीतील पाणी आटल्याने पिण्याच्या पाण्यासाठी स्वखर्चाने टँकर मागवावा लागत असल्याची व्यथा मोटे यांनी पथकासमोर मांडली. परिसरातील अन्य शेतकऱ्यांनीही ऊस पीक जळून गेल्याचे सांगितले.पिकांसाठी पाणी उपलब्ध नसणे, विहिरी आटणे आणि पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागणे, यामुळे शेतीसह दैनंदिन जीवनावरही गंभीर परिणाम होत असल्याचे या संवादातून स्पष्ट झाले.पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी बंधारे उभारणे, भूजल पुनर्भरण वाढविणे आणि गाळ साचलेल्या विहिरींचे पुनरुज्जीवन करणे, अशा उपाययोजनांची आवश्यकता स्थानिकांनी मांडली. पावसाचे पाणी अडवून त्याचा साठा वाढविणे आणि जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण वाढविणे, यामुळे भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यास मदत होऊ शकते. या पाहणीतून जलसंधारण आणि भूजल पुनर्भरणाचे महत्त्व अधोरेखित झाले.केंद्रीय पथकाने जिल्ह्यातील विविध ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांच्या अडचणी, पिकांचे नुकसान आणि पाणीटंचाईची स्थिती जाणून घेतली. या पाहणीच्या आधारे बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यमापन करण्यात येत आहे

------------

### मोठा निर्णय; शाळाबंद'चा

आणि 'शाळा वाचवा, शिक्षण वाचवा' मंचाच्या प्रतिनिधींची गुरुवारी मंत्रालयात बैठक झाली. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या बैठकीत सरकारने सर्वेक्षण पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे २०पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांबाबतचा निर्णयही या प्रक्रियेनंतरच होण्याची शक्यता आहे. १५ मार्च २०२४च्या शासन निर्णयानुसार २०पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. २०२५च्या उपलब्ध आकडेवारीनुसार राज्यात अशा १४ हजार २५१ शाळा आहेत. मात्र, आदिवासी, डोंगराळ किंवा दुर्गम भागातील शाळांच्या परिस्थितीचा स्वतंत्र विचार केला जाणार आहे. ग्रामसभा आणि पालकांची मतेही निर्णयप्रक्रियेत घेतली जाणार आहेत. आझाद मैदानात पाच ऑक्टोबरपासून सुरू असलेले बेमुदत आंदोलन सरकारच्या आश्वासनानंतर तूर्त स्थगित करण्यात आले आहे.

----------

### राज्यात आता ३०१

माहिती महसूलमंत्री बावनकुळे यांनी शुक्रवार दि. ९ ऑक्टोबर रोजी दिली. या नव्या दुष्काळी तालुक्यातही पंचनामे करण्यात येणार असून शेतक–यांना त्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. दुष्काळ सदृश्य परिस्थिती असलेल्या तालुक्यांसाठी सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील १८ तालुक्यांत ग्राऊंड ट्रुथिंग करण्यास सरकारने मंजुरी दिली आहे. ५ प्रमुख पिकांच्या २० टक्के सर्वेक्षणाचे आदेशही काढण्यात आले आहेत. तसेच दुष्काळ सदृश्य परिस्थिती असलेल्या या १८ तालुक्यांमध्ये सर्व्हेक्षण होणार आहे. नांदेड, चंद्रपूर, गोंदिया, वर्धा, भंडारा, नाशिक, सातारा, सांगली जिल्ह्यातील तालुक्यांचा या दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश करण्यात आला आहे.दुष्काळी मदतीचा विस्तार करताना महसूलमंत्र्यांनी स्पष्ट केले. कॅबिनेट उपसमितीसमोर आणि पालकमंत्र्यांच्या दौ–यादरम्यान आमदारांपासून खासदारांपर्यंत अनेक लोकप्रतिनिधींनी दुष्काळातून सुटलेल्या तालुक्यांबाबत निवेदने दिली होती. त्यानुसार २६५ तालुक्यांव्यतिरिक्त ३६ तालुक्यांची यादी तयार करण्यात आली आहे. पहिल्या १८ तालुक्यांचे २० टक्के ग्राउंड ट्रुथिंग करून त्यांना दुष्काळी यादीत समाविष्ट करण्याचा जीआर निघाला आहे. तर उर्वरित १८ तालुक्यांचे प्राथमिक अहवाल येताच त्यांचेही ग्राउंड ट्रुथिंग केले जाईल.

-----------

### पुणे पदवीधरमधून शिंदे

मी अर्ज मागे घेत आहे,'' अशी माहिती भैय्या माने यांनी दिली आहे. तर दुसरीकडे, मंगेश चिवटे यांचा प्रतिनिधीही अर्ज मागे घेण्यासाठी पुण्याच्या विभागीय आयुक्त कार्यालयात पोहोचल्याने त्यांची माघारही निश्चित झाली आहे.दरम्यान, महायुतीतील प्रमुख बंडखोर उमेदवारांच्या माघारीमुळे आता पुणे पदवइीधर आणि शिक्षक मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना रंगणार आहे.पदवीधर मतदारसंघात भैय्या माने आणि शिक्षक मतदारसंघात मंगेश चिवटे यांनी निवडणूक लढवली असती तर महायुतीतील मतविभाजनाचे गणित अधिक गुंतागुंतीचे होण्याची शक्यता होती. पदवीधर मतदारसंघात गुरुवारपर्यंत तब्बल ६८ उमेदवार रिंगणात होते. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या हर्षदा जाधव–देशमुख आणि भाजपच्या डॉ. स्मिता जाधव यांच्यात प्रमुख लढत मानली जात असली, तरी भैय्या माने यांचा अर्ज कायम राहिला असता तर निवडणुकीची समीकरणे आणखी बदलली असती. मंगेश चिवटे यांच्या माघारीने भाजपच्या कौस्तुभ गावडे यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

---------------

### पदावर नाहीत मग राजीनामा

आहे, तो राज्य सरकारला नाहीये. जर त्यांच्या विरोधात चौकशी समितीनं काही अहवाल दिला की हे अशा अशा पद्धतीनं दोषी आहेत. जो पदावर नव्हताच त्याच्यावरही आम्ही चौकशी लावायला तयार आहोत, आणि त्याचा काही दोष निघाला तर ३१७ प्रमाणं त्यांना हटवण्याची राष्ट्रपतींना शिफारस करु, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. हे जे आंदोलन चाललेलं आहे ते सुरुवातीला एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचं होतं, आता ते राजकीय आंदोलन सुरु आहे. आता ते विद्यार्थ्यांचं आंदोलन राहिलेलं नाही, ते पूर्णपणे राजकीय आंदोलन चाललेलं आहे. एका इव्हेंटसारखं ते सुरु आहे. तथापि आमचं सरकार चर्चेतून मार्ग काढायचा प्रयत्न करत आहे. माननीय उच्च न्यायालयानं बेकायदेशीर ठरवलं आहे. तिथं बसता येणार नाही असं स्पष्टपणे सांगितलं आहे, तरी देखील उच्च न्यायालयाचा अवमान करुन ते तिथं बसलेले आहेत. आमचा प्रयत्न मुलांना न्याय कसा द्यायचा हे असल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

-----------

### नंदीग्राम पोटनिवडणुकीत

प्रधान यांचा १,२२,७५३ मतांच्या फरकाने पराभव केला. रथ या चंद्रनाथ रथ यांच्या मातोश्री आहेत. चंद्रनाथ रथ हे पश्चिम बंगालचे नेते सुवेंदू अधिकारी यांचे निकटवर्तीय होते. मात्र भाजपचा विधानसभा निवडणुकीतील विजय झाल्यांनतर काही दिवसांनीच मे महिन्यात त्यांची हत्या झाली होती.शंकरराव सरकार यांनी रेजीनगरमधून पोटनिवडणूक लढवली. त्यांना एकूण १,२९,९१४ एवढे मते मिळाली. त्यांच्या विरोधात 'आम जनता उन्नयन पार्टी' च्या गुलाम नबी आझाद यांचा परभाव केला. गुलाम नबी आझाद यांना ५४,०९८ एवढे मते मिळाली होती. एकूण ७५,८१६ मतांच्या फरकाने शंकरराव सरकार यांनी विजय मिळवला.

------------

### फडणवीस निवडणूक

जुन्नरमध्ये पत्रकारांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, मूळ शिवसेना ही उद्धव ठाकरे यांची आहे. बाकी सेना डुप्लिकेट आहेत, या डुप्लिकेटचा खेळ सर्वोच्च न्यायालय संपवणार. ज्या पद्धतीने सुनावणी पुढे चालली आहे आणि निवडणूक आयोगाने आणि तेव्हाच्या सर्वोच्च न्यायालयाने शिवसेनेचे तुकडे करताना असंविधानात्मक पद्धतीने जी पापं केली, त्याच पापाविरोधात आज आगडोंब उसळलेला आहे. त्यामुळे आता मूळ शिवसेनेचेच राज्य येईल. २०२४ साली सुद्धा विधानसभेत शिवसेनाच जिंकली होती हे आता लोकांना पटायला लागले आहे. राज्यात आणि देशात भाजपचा विजय कसा झाला हे आता ज्ञानेश कुमारांचे कारनामे समोर आले आहेत. राज्यात मिंधे, फडणवीस आणि ज्ञानेश कुमार या त्रिकुटाचे जे कारनामे झाले त्यातून हा अकृत्रिम पराभव घडवला गेला. ज्ञानेश कुमार यांचा निकाल लावा आणि ताबडतोब निवडणुका लावल्या तर मिंधे गट आणि भाजप इथे औषधलाही राहणार नाही. आम्ही आशावादी आहोत, जनतेचे अनेक प्रश्न आहेत त्यावर देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार बोलत नाहीत. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकदिवसा आड दिल्लीत असतात. त्यांच एवढं दिल्लीत काय काम असते आम्हाला माहित नाही. या सगळ्या गोष्टींची नोंद जनता करत असते. राज्यात दुष्काळ पडला आहे आणि त्यावर कोणीही गांभीर्याने चर्चा करताना दिसत नाही. महाराष्ट्रात जमिनीवर काम करणारा एकच पक्ष आहे तो म्हणजे शिवसेना, असे संजय राऊत म्हणाले.

------------

### राज ठाकरे मुख्यमंत्र्यांशी

तरुणांना आणि तरुणींना पाहिलं की जिवाची कालवाकालव होते. म्हणून आज या विषयावर माझी मुख्यमंत्र्यांशी सविस्तर चर्चा झाली. ते देखील पूर्णपणे सकारात्मक आहेत हे जाणवलं. येत्या काही दिवसांत च्या विद्यार्थ्यांच्या नोकऱ्यांसंदर्भात एक चांगली बातमी येईल, अशी अपेक्षा आहे . त्यामुळे विद्यार्थ्यांनी देखील संयम ठेवावा,'' असं आवाहन राज यांनी सोशल मिडिया पोस्टमधून केलं आहे.दरम्यान, राज ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना आश्वस्त केल्यानंतर सरकारकडून आता नोकऱ्यांबाबत नेमकी काय मोठी घोषणा केली जाते, हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पुणे पोलिसांनी गुरुवारी दुसऱ्यांदा परवानगी नाकारली. पोलिसांनी आंदोलनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ किंवा बंडगार्डन परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळील उद्यान परिसर या जागांचे पर्याय दिले आहेत. आंदोलनस्थळावरील जागा परीक्षार्थींनी जागा सोडावी, अशी सूचना पोलिसांनी ध्वनिक्षेपकावरून केली. मात्र, रात्रीपर्यंत त्यांनी आंदोलनस्थळ सोडले नव्हते. 'एमपीएससी'च्या परीक्षा प्रक्रियेविरोधात विद्यार्थ्यांचे एस. एम. जोशी पुलावर गेल्या सहा दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. या आंदोलनामुळे वाहतुकीवर परिणाम होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील अमित सुपेकर आणि सौरभ वीरकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. 'एमपीएससी'च्या परीक्षांबाबत कार्यवाहीचा रोडमॅप तीन आठवड्यांत सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने सरकारला दिले आहेत.

--------------

### ..तर महिलेने जीवन संपवल्यास

वेगवेगळ्या प्रतिक्रिया व्यक्त करत असतात. जर एखादे नाते तुटल्यानंतर किंवा ब्रेकअपनंतर एखाद्या व्यक्तीने टोकाचे पाऊल उचलून आत्महत्या केली, तर प्रत्येक प्रकरणात सरसकटपणे समोरच्या व्यक्तीवर आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला जाऊ शकत नाही. हे संपूर्ण प्रकरण तेलंगण राज्यातील आहे. या प्रकरणात मृत महिला आणि मुख्य आरोपी यांच्यात प्रेमसंबंध होते आणि ते तिन्ही महिने आरोपीच्या घरी एकत्र राहत होते. आरोपीच्या कुटुंबीयांनीही त्यांचे हे नाते स्वीकारले होते, अशी बाब न्यायालयाने स्पष्ट केली आहे.फिर्यादी पक्षानुसार, आरोपीने महिलेसोबत लग्न करण्यास स्पष्ट नकार दिला होता, तर त्याच्या घरातील इतर पाच जणांनीही तिला सोडून देण्याचा किंवा लग्न न करण्यासाठी प्रभावित केले. मृत महिलेच्या बहिणीच्या जबाबाच्या आधारे या प्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आला होता. तथापि, सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले की, आरोपींकडून अशी कोणतीही कृती किंवा चिथावणी देण्यात आली नव्हती, ज्यामुळे त्यांनी त्या महिलेला आत्महत्येसाठी प्रत्यक्षपणे प्रवृत्त केल्याचे सिद्ध होईल. लग्न न करण्याच्या निर्णयामागे त्या महिलेला आत्महत्या करण्यास भाग पाडण्याचा कोणताही हेतू आरोपींचा नव्हता, तसेच त्यांच्या नकारानंतर ती महिला आत्महत्या करेल याची कोणतीही पूर्वकल्पना आरोपींना असू शकत नव्हती, असे न्यायालयाने नमूद केले.

---------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. १० ऑक्टोबर २०२६


## थोडक्यात




### मोठेवाडी ग्रामपंचायत कार्यालयात वीर जीवाजी महाले जयंती उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांचे निष्ठावंत अंगरक्षक वीर जीवाजी महाले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले.

'होते जीवाजी म्हणून वाचले शिवाजी' या ऐतिहासिक उक्तीतून वीर जीवाजी महाले यांच्या शौर्याची, प्रसंगावधानाची आणि स्वामीनिष्ठेची महती अधोरेखित होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रक्षणासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या या शूरवीराच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या पराक्रमाला उजाळा देण्यात आला.

या कार्यक्रमाला उपसरपंच अंगद खेत्री, पत्रकार राजाभाऊ पास्टे, जगन्नाथ खेत्री, ॲड. पांडुरंग गोंडे, अशोक रासवे, नागनाथ खटले, गणेश सर्जे, प्रकाश शेळके, अमोल पास्टे, कडाजी नावडकर आणि अतुल गोंडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

### सुंदरराव सोळंके महाविद्यालयात कपिलाची नोंदणी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयामध्ये कपिला अर्थात कलाम प्रोग्राम फॉर आयपी लिटरसी अँड अवेअरनेसची नोंदणी करण्यात आली. हा प्रोग्राम भारताच्या शिक्षण मंत्रालय, 'इनोव्हेशन सेल'द्वारे चालवला जातो. कपिलाद्वारे महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच माजलगाव परिसरातील नागरिक यांना पेटंट नोंदणी करावयाची असल्यास त्यासाठी आर्थिक सहाय्य व नोंदणीसाठी लागलेला खर्च मिळू शकतो. तसेच संस्थेमध्ये नवोपक्रम, उद्योजकता आणि स्टार्टअपची संस्कृती पद्धतशीरपणे विकसित करता येणार आहे. महाविद्यालयात बौद्धिक संपदा साक्षरतेसाठी आणि नवकल्पनांच्या विकासासाठी हा प्रोग्राम महत्वपूर्ण ठरणार आहे. या समितीमध्ये महाविद्यालयाचे प्रमुख म्हणून प्राचार्य डॉ. अभय सोळुंके, लिगल डव्हायझर म्हणून ड. भानुदासरावजी डक, इंडस्ट्रियल एक्सपर्ट म्हणून अदवा हारवेस्टचे डायरेक्टर डॉ. राघवेंद्र प्रताप सिंग, माजी विद्यार्थी सदस्य रवींद्र कानडे, समिती समन्वयक डॉ. नितीन ढवळे, सदस्य म्हणून डॉ. गणेश मोकासरे व डॉ. अर्चना कचरे अशी समिती असणार आहे. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके, सरचिटणीस आमदार सतीश चव्हाण यांनी प्राचार्य व सर्व समिती सदस्यांचे अभिनंदन केले.



### मा.खा.समीर भुजबळ यांचा वाढदिवस बीडमध्ये विविध उपक्रमांनी साजरा

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे कार्याध्यक्ष तथा मा.खासदार समीर भाऊ भुजबळ यांचा वाढदिवस बीडमध्ये समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक आणि धार्मिक उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे.

२० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण असा उपदेश सांगणाऱ्या राज्याचे कॅबिनेट मंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांचे पुतणे आदरणीय समीरभाऊ भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये महात्मा फुले समता परिषद बीड जिल्ह्याच्या वतीने बीड शहरातील शाहिद भगतसिंग विद्यालय येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले तसेच बीड शहराचे ग्रामदैवत श्री कंकालेश्वर मंदिर येथे महाअभिषेक करण्यात आला. त्याचबरोबर हजरत शेहनशाहवली दर्गा येथे चादर चढविण्यात आली. याप्रसंगी महात्मा फुले समता परीषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अँड सुभाष राऊत, समता परिषद जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे,शहराध्यक्ष नितीन राऊत, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, मंगेश जमदाडे, शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सवाचे अध्यक्ष तुषार दोडके, महेश चौथरे, अजय शिंदे, राहुल यादव, संतोष यादव, विशाल राऊत, यांच्यासह समता परिषदेचे पदाधिकारी समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुष्काळजन्य परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्यासाठी ठोस निर्णय घ्या

## डॉ.योगेश क्षीरसागर यांचे नेतृत्वाखाली भाजपाने दिले जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीची तीव्रता लक्षात घेऊन नागरिकांना दिलासा देण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी भाजपच्यावतीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे बुधवारी (दि.७) करण्यात आली. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात पुढे म्हटले की, शहरातील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासह ग्रामीण भागातील नागरिक आणि पशुधनासाठी पाणी व चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करावी. शहरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा व्हावा, यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी. कॅनॉल रोड ते पाली धरण नवीन पाइपलाइनचा प्रस्ताव मार्गी लावावा, पाणीगळती रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात तसेच अनधिकृत नळजोडण्यांवर कारवाई करावी. याशिवाय रेल्वे स्टेशन परिसरातील विहिरींचे अधिग्रहण करून त्यांचा पाणी पुरवठ्यासाठी उपयोग करावा. शहरातील बंद बोअरवेल आणि हातपंपांची तातडीने दुरुस्ती करावी, तसेच जलसंधारणाची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत. ग्रामीण भागातील दुष्काळी



परिस्थितीचा विचार करून नागरिकांसह पशुधनासाठी नियमित टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा. जनावरांसाठी चारा आणि पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करावी, सार्वजनिक विहिरींना मंजुरी द्यावी, तसेच दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या विविध दुष्काळी योजनांचा लाभ तातडीने मिळवून द्यावा. दुष्काळाची वाढती तीव्रता लक्षात घेता शासनाकडून उपलब्ध निधी आणि विविध योजनांचा प्रभावी वापर करून पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर काम करावे. शहर आणि ग्रामीण भागातील नागरिकांना तातडीने दिलासा मिळेल, अशा उपाययोजना प्राधान्याने राबवाव्यात, अशा मागण्या जिल्हा प्रशासनाकडे केल्या आहेत. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर, भाजपच्या बीड नगरपरिषदेच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह भाजपचे जिल्हा, तालुका, शहर कार्यकारिणीचे प्रमुख पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दुष्काळी उपाययोजनांसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांचे अभ्यासपूर्ण निवेदन

बीड विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी जिल्हा परिषद गटनिहाय आवश्यक उपाययोजनांचा समावेश असलेले सविस्तर निवेदन त्यांनी प्रशासनाला सादर केले आहे. मतदारसंघातील दुष्काळी प्रश्नांवर उपाययोजना सुचविणाऱ्या या अभ्यासपूर्ण निवेदनामुळे प्रशासनाला गावोगावी आवश्यक मदत पोहोचविण्यासाठी नियोजन करता येणार असून, दुष्काळग्रस्तांना तातडीने दिलासा देण्यासाठी उपाययोजना राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

# एल निनोच्या प्रभावामुळे मराठवाडा दुष्काळाच्या वाटेवर

## डॉ.एच.बी.शिरमाळे यांचे प्रतिपादन; वृक्षसंवर्धन व पर्यावरण रक्षणाची गरज

युसूफवडगांव/प्रतिनिधी

केज तालुक्यातील बनसारोळा येथील जनविकास महाविद्यालयात आयोजित 'दुष्काळ' या भित्तीपत्रकाच्या विमोचन कार्यक्रमात मराठवाड्यात सध्या जाणवत असलेल्या पावसाच्या अनिश्चिततेमागे विविध नैसर्गिक तसेच मानवनिर्मित कारणे असून, एल निनोच्या प्रभावामुळे मराठवाड्यात पावसाची उणीव भासत आहे. त्यामुळे दुष्काळाचे संकट अधिक गडद होण्याची शक्यता आहे, असे प्रतिपादन शरदचंद्र महाविद्यालय शिराढोण येथील प्रा.डॉ.एच.बी शिरमाळे यांनी केले.



यावेळी आयोजित कार्यक्रमात प्रा.डॉ.एच.बी शिरमाळे यांनी बोलताना त्यांनी दुष्काळाची कारणे,त्याचे परिणाम तसेच भविष्यातील उपाययोजनांवर सविस्तर भाष्य केले.मानवाने निसर्गाकडून मोठ्या प्रमाणावर संसाधने घेतली आहेत; मात्र त्याच प्रमाणात निसर्गाचे संवर्धन करण्याची जबाबदारीही मानवाची आहे. वाढते सिमेंट-काँक्रीटचे बांधकाम, झपाट्याने होत असलेले शहरीकरण तसेच दिवसेंदिवस कमी होत चाललेली जंगलसंपदा आणि वृक्षसंख्या ही चिंतेची बाब असल्याचे डॉ. शिरमाळे यांनी नमूद केले.

दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी केवळ शासनाच्या उपाययोजनांवर अवलंबून न राहता प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संवर्धनात आपला सहभाग नोंदवणे गरजेचे आहे. वृक्षारोपणाला प्रोत्साहन देणे, लावलेल्या झाडांचे संगोपन व संवर्धन करणे आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश मोठ्या प्रमाणावर जनतेपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.दुष्काळ ही केवळ पावसाअभावी निर्माण होणारी परिस्थिती नसून त्यामागे पर्यावरणीय असंतुलनासह अनेक घटक कारणीभूत असतात. त्यामुळे पाणी बचत, जलसंधारण, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अंगीकार करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.ए लहाडे होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व ज्ञानाला चालना देण्यासाठी महाविद्यालयात सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात. अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याबरोबरच खऱ्या अर्थाने समाजप्रबोधन घडते, असे मत डॉ. लहाडे यांनी व्यक्त केले.यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. पिसाळ हरिदास यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. संतोष हरिभाऊ कणसे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. गोरे बाळासाहेब व प्रा. रवी रोकडे यांनी परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाथर्डी आगाराला अंमळनेर-कोतन-पिंपळवंडी परिसरातील प्रवाशांची ॲलर्जी

## पाथर्डी-करमाळा बस दोनच दिवस या मार्गे आली-गेली व पुन्हा बंद झाली

पिंपळवंडी । प्रतिनिधी

अनेक वर्षापासून पाथर्डी आगारातून दुपारी २:३०वाजता सुटणारी मोहटादेवी-पांढरवाडी फाटा-कोतन-अंमळनेर-पिंपळवंडी-कुसळंब-जामखेड मार्गे पाथर्डी- करमाळा मुक्कामी बस कोतन-अंमळनेर-पिंपळवंडी मार्गे एक वर्षापासून जात नसल्याने या गावाप्रमाणे खोपटी-पांगरी-भडकेल परिसरातील विद्यार्थी,महिला, शेतकरी,वारकरी, ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्य प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.ही बस पूर्वीप्रमाणेच कोतन-अंमळनेर-पिंपळवंडी-कुसळंब मार्गे पूर्ववत सुरू करावी अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे. गेल्या वर्षी पावसाळ्यात धोपटवाडी घाटातील रस्ता काम चालू असल्याने ही बस पर्यायी मार्ग म्हणून अन्य मार्गाने सुरू केली होती.हा घाट रस्ता वाहतुकीस सुरळीत होऊन बराच कालावधी लोटला असून या रस्त्याने बससह अवजड वाहतूक मोठ्या प्रमाणात होत आहे.ही बस या परिसरातील प्रवाशांसाठी पाथर्डी व जामखेड येथे जा-ये करण्यासाठी अत्यंत सोयीचे असल्याने या मार्गे बस बंद केल्याने या परिसरातील प्रवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे व खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे.पाथर्डी आगार प्रमुखांना कोतन-अंमळनेर-पिंपळवंडी-खोपटी-पांगरी परिसरातील प्रवाशांची एलर्जी आहे काय?असा संतप्त सवाल प्रवासी वर्गातून विचारला जात आहे.अनेक वर्षापासून या मार्गे चालू असलेल्या बसचा मार्ग बदलून आगारप्रमुखांनी प्रवाशांच्या जखमेवर मीठ चोळवण्याचा प्रकार चालविला आहे.या बसणे या परिसरातील सर्व स्तरातील प्रवाशांसह वारकरी श्री.क्षेत्र मोहटादेवी,श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड,श्री क्षेत्र पंढरपूर दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात जा-ये करतात. तीर्थ स्थळाला जाण्यासाठी या बसला मोठ्या प्रमाणात प्रवासी असतात.तसेच नवरात्रोत्सवात श्री क्षेत्र मोहटादेवीच्या दर्शनासाठी खोपटी-पिंपळवंडी-अंमळनेर- कोतन-भडकेल-पांगरी परिसरातील भाविक-भक्त मोठ्या प्रमाणात जातात याची पाथर्डी आगार प्रमुखांनी दखल घेऊन नवरात्र महोत्सवाच्या मुहूर्ताचे औचित्य साधून ही बस कोतन- अंमळनेर-पिंपळवंडी गावातून पूर्ववत सुरू करावी.व भाविक-भक्तांना श्री क्षेत्र मोहटादेवीचे दर्शन घडवावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.या आठवड्यात दोनच दिवस या बसने कोतन- अंमळनेर-पिंपळवंडीकरांना दर्शन देऊन गायब झाली व प्रवाशांचा अपेक्षाभंग केला.ही बस या मार्गे नवरात्र उत्सव दरम्यान सुरू न केल्यास या परिसरातील प्रवासी लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याच्या तयारीत असल्याची चर्चा होत आहे.

## पान ६ वरुन...

### दुष्काळात सरकार शेतकऱ्यांच्या

लवकरच तुमच्या हाताला काम देऊ. कोणीही स्थलांतर करू नये, यासाठी शासनदरबारी प्रयत्न करणार असून प्रत्येकाच्या हाताला काम मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करू, असे आश्वासनही त्यांनी दिले.

जायकवाडीचे ३.५७ टीएमसी पाणी आणण्याचा निर्धार

पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांसाठी जायकवाडी धरणातून ३.५७ टीएमसी पाणी आणण्याच्या प्रस्तावाचा उल्लेख करत आमदार धस यांनी हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे सांगितले. विरोधकांच्या जनआक्रोश मोर्चावर टीका करताना, तो माजी आमदारांचा जनआक्रोश मोर्चा नव्हता, तर माजींचा आक्रोश मोर्चा होता, अशी टिप्पणी त्यांनी केली.

चारा डेपो की पशुधन छावण्या? मुख्यमंत्रीशी चर्चा करणार - आ.धस

दुष्काळात पशुधन वाचविणे हे मोठे आव्हान बनले आहे. शासनाने तातडीने चारा डेपो सुरू करावेत, अशी मागणी बैठकीत शेतकरी व सर्व उपस्थितां कडून करण्यात आली. मात्र, अनेक शेतकऱ्यांची घरे आणि वाड्या-वस्त्या चारा डेपोपासून दूर असल्याने चारा आणण्याचा वाहतूक खर्च परवडत नाही. त्यामुळे केवळ डेपो सुरू करण्यापेक्षा गरजू पशुपालकांपर्यंत चारा पोहोचेल, अशी व्यवस्था करावी किंवा वस्तीनिहाय पशुधन छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

यावर आमदार धस यांनी दुष्काळाच्या परिस्थितीत चारा डेपो, पशुधन छावण्या अथवा थेट अनुदान यापैकी कोणता पर्याय प्रभावी ठरेल, याबाबत मुख्यमंत्री यांची भेट घेऊन चर्चा करणार असल्याचे सांगितले. दुष्काळग्रस्तांना सर्वतोपरी मदत मिळवून देण्यासाठी शासनदरबारी मी पाठपुरावा करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

मनरेगातून कामे; कर्जहप्त्यांबाबतही पाठपुरावा

दुष्काळामुळे रोजगाराचा प्रश्न गंभीर होत असताना व्हीबी-जी राम जी मनरेगा योजनेच्या माध्यमातून मजुरांना काम उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडे प्रयत्न करणार असल्याचे आमदार धस यांनी सांगितले. शेतकऱ्यांची ट्रॅक्टर व शेती अवजारांशी संबंधित बँक कर्जप्रकरणे आणि कर्जहप्त्यांबाबतही दिलासा मिळावा, यासाठी मागणी करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या तसेच कर्जाचे नूतनीकरण करणाऱ्या शेतकऱ्यांनाही थकीत कर्जदारांप्रमाणे काही सवलती मिळाव्यात, यासाठी शासनदरबारी पत्रव्यवहार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संकट उंबरठ्यावर; पशुधन आणि दुग्धव्यवसाय वाचविण्याची मागणी

दुष्काळाची तीव्रता आणखी वाढल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी संभाव्य संकटाचा विचार करून आताच नियोजन करणे गरजेचे असल्याचे शेतकऱ्यांनी बैठकीत नमूद केले. आगामी काळात पाणीटंचाई वाढल्यास शेतीबरोबरच पशुधन आणि ग्रामीण भागातील दुग्धव्यवसायही संकटात सापडण्याची भीती व्यक्त करण्यात आली.

संकटाच्या काळात कार्यकर्त्यांनी प्रत्येक गरजू कुटुंबाच्या दारात जाऊन त्यांना धीर द्यावा, मदतीसाठी आपण सोबत असल्याचा विश्वास द्यावा आणि स्थलांतर रोखण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले.

### आष्टीकर महिलांसाठी नवरात्रीत

या महोत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये केवळ महिलांनाच प्रवेश दिला जाणार आहे. महिलांना सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात नवरात्रोत्सव साजरा करता यावा,यासाठी आयोजकांनी ही संकल्पना राबविली आहे.या तीन दिवसीय महोत्सवात महिलांना पारंपरिक दांडियाच्या तालावर ठेका धरता येणार असून, नवरात्रोत्सवाचा आनंद द्विगुणित करण्याची संधी मिळणार आहे.आपल्या मैत्रिणींसोबत, कुटुंबातील महिलांसोबत या कार्यक्रमात सहभागी होऊन नवरात्रीच्या उत्सवाचा आनंद घेता येणार आहे.

**महोत्सवात सहभागी होण्यासाठी संपर्क साधा**

या दांडिया महोत्सवात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिलांनी मनिषा चौरे, कल्पना मेहेर, मनिषा गोल्हार, वर्षा भंडारी, सायली हंबर्डे, कांचन गोल्हार, निकिता रानडे आणि अर्चना धस यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### तालुका स्टेडियमवर अतिक्रमणाचा

तर भविष्यात खेळाडूंना सरावासाठी जागा कुठे मिळणार, असा सवाल उपस्थित होत आहे. खेळाडू घडविण्यासाठी मैदान आवश्यक असताना मैदानच संकुचित करण्याचा प्रकार सहन केला जाणार नाही, अशी भूमिका क्रीडाप्रेमींमधून व्यक्त होत आहे.

खेळाडूंच्या प्रमुख मागण्या

नगर-बीड-जामखेड मार्गालगतचे तार कंपाउंड तातडीने हटवावे.

तालुका स्टेडियमची अधिकृत हद्द निश्चित करावी.

स्टेडियमची जागा अतिक्रमणमुक्त ठेवावी.

मैदानाची पाहणी करून वस्तुस्थितीचा अहवाल जाहीर करावा.

खेळाडूंना मैदानाचा पूर्ण वापर करता यावा, यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.तालुका स्टेडियमच्या जागेचा प्रश्न प्रशासनाने गांभीर्याने घेऊन तातडीने चौकशी करावी; अन्यथा खेळाडू व क्रीडाप्रेमींच्या आंदोलनाला सामोरे जावे लागू शकते, असा इशाराही देण्यात येत आहे.

# नेकनूर येथील अप्पर तहसील कार्यालय जिल्हा परिषद शाळेच्या आवारातील इमारतीमध्ये सुरू करावे

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे नेकनूर येथे नव्याने सुरू होणाऱ्या अप्पर तहसील कार्यालयासाठी बसस्थानकाच्या पूर्वेस असलेल्या जिल्हा परिषद शाळेची इमारत उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी महा एनजिओ फेडरेशनचे मार्गदर्शक प्राचार्य डी जी तांदळे सर आणि बीड जिल्हा समन्वयक बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी साहेब, तहसीलदार तसेच संबंधित महसूल अधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

नेकनूर हे बीड तालुक्यातील महत्त्वाचे गाव असून परिसरातील अनेक गावांसाठी ते प्रशासकीय, बाजारपेठ आणि वाहतुकीच्या दृष्टीने मध्यवर्ती ठिकाण आहे. नेकनूर येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू झाल्यास परिसरातील नागरिकांना महसूल विभागाशी संबंधित विविध कामांसाठी बीड शहरात जाण्याची आवश्यकता मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

नागरिकांच्या सोयीच्या ठिकाणी कार्यालयाची मागणी



नव्याने सुरू होणाऱ्या अप्पर तहसील कार्यालयासाठी नागरिकांना सहज पोहोचता येईल, सार्वजनिक वाहतुकीची सुविधा उपलब्ध असेल आणि परिसरातील नागरिकांसाठी मध्यवर्ती ठरेल, अशी जागा निश्चित करणे आवश्यक असल्याचे बाजीराव ढाकणे यांनी निवेदनात म्हटले आहे.

नेकनूर बसस्थानकाच्या पूर्वेस असलेली जिल्हा परिषद शाळेची इमारत सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने सोयीच्या ठिकाणी आहे. त्यामुळे या इमारतीची प्रशासकीय व तांत्रिकदृष्ट्या पाहणी करून ती अप्पर तहसील कार्यालयासाठी योग्य असल्यास उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतकरी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना होणार फायदा

नव्याने निर्माण झालेलं अप्पर तहसील कार्यालय नेकनूर येथे सुरू झाल्यास परिसरातील शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिक तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना विविध महसूल सेवा जवळच्या ठिकाणी उपलब्ध होतील. त्यामुळे नागरिकांचा वेळ, प्रवासाचा खर्च आणि अनावश्यक प्रशासकीय त्रास कमी होण्यास मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संयुक्त पाहणीची मागणी

जिल्हा परिषद शाळेच्या सदर इमारतीमधील आवश्यक वर्ग खोल्या शिवाय शिल्लक असलेल्या इमारतींची महसूल विभाग, जिल्हा परिषद व शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे पाहणी करावी. इमारतीची उपलब्धता, बांधकामाची स्थिती, क्षेत्रफळ आणि अपर तहसील कार्यालयासाठी आवश्यक सुविधांची पूर्तता होऊ शकते का, याबाबत अहवाल तयार करावा, अशी मागणी प्राचार्य डी जी तांदळे यांनी केली आहे.

दरम्यान, सदर इमारत सध्या शैक्षणिक वापरासाठी आवश्यक असल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर कोणताही परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. त्यासाठी आवश्यक असल्यास पर्यायी शासकीय इमारत किंवा योग्य जागेचा पर्याय उपलब्ध करून देऊनच अंतिम निर्णय घेण्यात यावा, अशी भूमिका बाजीराव ढाकणे यांनी मांडली आहे.

नेकनूर येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू होणे हा परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा प्रशासकीय निर्णय असून, जागा निश्चितीची प्रक्रिया करताना सर्वांच्या सोयीची इमारत निवडावी म्हणजे नागरिकांना अडचणी निर्माण होणार नाहीत अशी मागणीही त्यांनी केली आहे.

अप्पर तहसील कार्यालयासाठी नागरिकांना सहज पोहोचता येईल आणि सार्वजनिक वाहतुकीने सोयीचे ठिकाण मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे बसस्थानकाच्या पूर्वेस असलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीची तातडीने पाहणी करून ती प्रशासकीय वापरासाठी योग्य असल्यास अप्पर तहसील कार्यालयासाठी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी केली आहे.

# २६५ दुष्काळी तालुक्यांत अन्नधान्याचा विनाविलंब पुरवठा होणार, सरकारचा महत्त्वाचा निर्णय

मुंबई : राज्यातील दुष्काळ जाहीर झालेल्या २६५ तालुक्यांतील लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्याचा पुरवठा विनाविलंब व सुरळीतपणे उपलब्ध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याबाबतचा शासन निर्णय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने जारी केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये खरीप २०२६ हंगामासाठी ढीळससशी-१ (प्रथम कळ) लागू करून विविध सवलती व उपाययोजना घोषित करण्यात आलेल्या आहेत. यानुसार दुष्काळग्रस्त भागातील शेतीवर आश्रित शेतकरी, शेतमजूर आदी घटकांना अन्नधान्याची टंचाई भासू नये, यासाठी प्रभावी व्यवस्था उभी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यादृष्टीने मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत केंद्र सरकारने विहित केलेल्या इष्टांकाच्या मर्यादेत गरजू लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य वितरित करण्यात येते. आता दुष्काळ जाहीर झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांत अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबत कार्यवाही निश्चित करण्यात आली आहे.



राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्याचा पुरवठा विनाविलंब व सुरळीतपणे उपलब्ध करण्याकरिता आवश्यक ती उपाययोजना करावी. एपीएल डीबीटी योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांना नियमितपणे देण्यात येईल याची दक्षता घ्यावी. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समावेश व आधार सिडिंग: सन २०२६ च्या खरीप हंगामात दुष्काळ जाहीर केलेल्या २६५ तालुक्यांमधील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट नसलेल्या कोणत्याही व्यक्तीने, मोफत अन्नधान्याची मागणी केल्यास त्या व्यक्तीचा विहित निकषांनुसार, त्यांच्या उत्पन्नाच्या व उपलब्ध इष्टांकाच्या मर्यादेत, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजने अंतर्गत अंत्योदय अन्न योजना किंवा प्राधान्य कुटुंब प्रवर्गात समावेश करावा. शिधापत्रिकेतील सर्व सदस्यांचे आधार सिडिंग पूर्ण करावे आणि त्यांना तत्काळ अन्नधान्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

एईपीडीएस व पॉस पकरणांद्वारे पोर्टेबिलिटी सुविधेचा लाभ: सद्य:स्थितीत, राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील पात्र लाभार्थ्यांना बायोमेट्रीक ओळख पटविल्यानंतर ई- पॉस यंत्राद्वारे अन्नधान्याचे वितरण केले जात आहे. राज्यातील सर्व पात्र लाभार्थ्यांच्या नोंदी एईपीडीएस प्रणालीवर उपलब्ध असून ई-पॉस यंत्राद्वारे 'वन नेशन वन रेशन कार्ड' अंतर्गत पोर्टेबिलिटीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दुष्काळ जाहीर झालेल्या २६५ तालुक्यांतून शेतमजूर व नागरिकांचे रोजगार किंवा पाण्यासाठी शहरी, निमशहरी अथवा नजीकच्या भागात स्थलांतर होण्याची शक्यता असते. अशा स्थलांतरित नागरिकांना त्यांच्या नेमून दिलेल्या रास्तभाव दुकानाव्यतिरिक्त इतर कोणत्याही सोयीच्या रास्तभाव दुकानातून अन्नधान्य उचल करता यावे, यासाठी पोर्टेबिलिटी सुविधेची काटेकोर अंमलबजावणी करावी. स्थलांतरामुळे एकही पात्र कुटुंब अथवा लाभार्थी हक्काच्या अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही याची सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी व्यक्तिगत दक्षता घ्यावी. तसेच दुष्काळग्रस्त भागातील पात्र लाभधारकांना शिधापत्रिका देण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# कोंबड्यांना येणारा ताण; कारणे आणि उपाय!

अंतर्गत शारीरिक कार्य सामान्यपणे करण्यासाठी कोंबड्या विविध वर्तणूक आणि चयापचय यंत्रणा वापरते, यालाच कोंबड्यातील ताण असे म्हणतात. व्यावसायिक कोंबडी पालनातील कोंबड्यांना अशा परिस्थितीचा सामना करावा लागतो. कोंबडीच्या ताणाचा कळपाच्या एकूण आरोग्यावर आणि उत्पादकतेवर लक्षणीय परिणाम होतो. त्यामुळे तणाव निर्माण करणारे घटक समजून घेणे गरजेचे आहे. हे घटक ओळखणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे हा यशस्वी पोल्ट्री उत्पादनाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

कोंबड्यांना ताण येण्याची विविध कारणे :अचानक हवामानातील बदलामुळे कोंबड्यांना ताण येऊ शकतो आणि प्रतिकारशक्ती कमकुवत होऊ शकते आणि ते संवेदनशील बनतात. वेगवेगळ्या कारणांमुळे कोंबड्या पुरेशा प्रमाणात आहार घेत नसतील तर ताण येऊ शकतो. खाद्य, आहारात पुरेशा पोषक तत्वांचा अभाव किंवा इतर घटक यामुळे सुद्धा ताण येतो. वजन वाढणे, कमी होणे किंवा वृद्धत्व यासारख्या घटनांमुळे तणाव निर्माण होतो. कोंबड्यांना पकडताना, विशिष्ट औषधे देताना



किंवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेले जाते, तेव्हा त्यांना भावनिक ताण येतो. रोग बरा करण्यासाठी दिलेल्या औषधांमुळे आणि कालावधीमुळे देखील ताण येऊ शकतो

कोंबड्यांचे ताण घालवण्यासाठी उपाय योजना : कोंबड्यांमधील ताण घालवण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी प्रत्येक कोंबडीला किती जागा लागते हे पाहून आपल्याजवळील उपलब्ध जागेनुसार एकूण कोंबड्यांची संख्या ठरवावी. तुमच्याकडे उपलब्ध असलेल्या जागेच्या आधारे कोंबडीची एकूण संख्या निश्चित करा. लहान जागेत जास्त गर्दी केल्याने वातावरणातील अमोनियाचे प्रमाण वाढते. शिवाय पक्षी एकमेकांच्या सानिध्यात असल्याने रोगाचा प्रादुर्भाव लवकर होतो. यावर उपाय म्हणून लिटरची स्वच्छता करावी. पावसाळ्यात आणि जास्त आर्द्रता असताना लिटर कोरडे ठेवावे. वातावरणातील बदलानुसार शेडमध्ये पडदे लावणे, पोती बांधणे या गोष्टींची वेळेवर काळजी घ्यावी. ताण घालवणारे औषधे तज्ज्ञांच्या सल्ल्याने द्यावीत. आहारातून किंवा पाण्यातून जीवनसत्वांचा पुरवठा केल्यास ताण कमी होतो. कोंबड्यांना ताण असताना त्यांना लसीकरण करू नये. प्रथम कोंबड्यांवरील ताण कमी करावा आणि नंतरच लसीकरण करावे.

# एक महत्त्वाचे नगदी आणि औषधी कंदपीक : सुरण लागवड

सुरण हे एक महत्त्वाचे नगदी आणि औषधी कंदपीक आहे. योग्य नियोजन आणि योग्य जमिनीची निवड केल्यास सुरणाच्या शेतीतून कमी खर्चात चांगले उत्पादन मिळवता येते.

हवामान आणि माती :हवामान: सुरण पिकासाठी उष्ण आणि दमट हवामान अतिशय पोषक असते. माती: पाण्याचा उत्तम निचरा होणारी, सुपीक, वालुकामय किंवा मध्यम काळी माती सर्वोत्तम मानली जाते. दलदलीच्या किंवा पाणी साचणाऱ्या मातीत कंद सडण्याची भीती असते. मातीचा कि६.० ते ७.५ असावा.

लागवडीची वेळ आणि बियाणे (कंद) :लागवडीची वेळ: एप्रिल ते मे महिना (मान्सूनपूर्व) हा सुरण लागवडीसाठी सर्वात योग्य काळ आहे. बियाणे निवड: लागवडीसाठी आदल्या वर्षाचे निरोगी कंद वापरले जातात. साधारण ५०० ग्रॅम ते १ किलो वजनाचे कंदाचे तुकडे (किंवा छोटे कंद) लागवडीसाठी योग्य मानले जातात. बीजप्रक्रिया: कंद कुजू नयेत म्हणून लागवडीपूर्वी कॉपर ऑक्सिक्लोराईड किंवा बुरशीनाशकाच्या द्रावणात कंद ५-१० मिनिटे बुडवून वाळवून घ्यावेत.

लागवड पद्धत आणि अंतर :पद्धत: जमिनीची २-३ वेळा खोल नांगरणी करून ११ फूट किंवा १.५१.५ फूट आकाराचे खड्डे खणावेत. अंतर: दोन ओळींत आणि दोन रोपांत २ ते ३ फूट अंतर ठेवावे. खतांचा वापर: खड्ड्यांमध्ये चांगली कुजलेली शेणखत, कडुनिंबाची पेंड आणि मातीचे मिश्रण भरून मध्यभागी कंद पुरावा.

पाणी आणि खत व्यवस्थापन :पाणी: पावसाळ्यात वेगळ्या पाण्याची गरज भासत नाही. मात्र, पावसाने ताण दिल्यास किंवा उन्हाळ्यात १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. खत: लागवडीनंतर २ ते ३ महिन्यांनी झाडाला भर (मातीची प्रणी) देताना सेंद्रिय खते किंवा नत्र-स्फुरद-पालशचा (छझघ) संतुलित डोस द्यावा.

काढणी :लागवडीनंतर साधारण ८ ते ९ महिन्यांत (नोव्हेंबर-डिसेंबर) सुरणाची पाने पिवळी पडून वाळू लागतात. पाने पूर्ण वाळल्यानंतर कंद जमिनीतून काळजीपूर्वक उकरून बाहेर काढावेत. प्रति एकर १५ ते २५ टनांपर्यंत उत्पादन मिळू शकते.



# योग्य नियोजन आणि अचूक पद्धत: अशी करा बटाट्याची लागवड अन् मिळवा दुप्पट नफा

घरच्या घरी किंवा शेतात बटाट्याची लागवड करणे अतिशय सोपे आहे. बटाटा हे जमिनीखाली येणारे पीक असल्याने त्यासाठी मातीची निवड आणि योग्य पद्धत वापरणे खूप महत्त्वाचे असते. बटाटा हे थंड हवामानात येणारे पीक आहे. त्यामुळे भारतात याची लागवड प्रामुख्याने ऑक्टोबर ते नोव्हेंबर या हिवाळ्याच्या सुरुवातीला केली जाते.

१. बटाट्याचे बेणे (बियाणे) तयार करणे लागवडीसाठी बाजारातून रासायनिक प्रक्रिया न केलेले, मध्यम आकाराचे बटाटे निवडा. ज्या बटाट्यांना 'डोळे' (एशी/र्डीीीी) म्हणजेच छोटे कोंब आलेले आहेत, ते लागवडीसाठी उत्तम मानले जातात. जर बटाटा मोठा असेल, तर त्याचे अशे तुकडे करा की प्रत्येक तुकड्यावर किमान १ ते २ कोंब असतील. तुकडे केल्यानंतर ते १-२ दिवस सावलीत सुकवून घ्या, जेणेकरून त्यांना बुरशी लागणार नाही. २. मातीची तयारी बटाट्यासाठी भुसभुशीत, पाण्याचा उत्तम निचरा होणारी आणि सुपीक माती आवश्यक असते. माती घट्ट असेल तर बटाट्याचा आकार मोठा होत नाही. मातीमध्ये भरपूर प्रमाणात शेणखत, गांडूळ खत आणि कोकोपीट मिक्स करा. यामुळे माती मऊ राहते. जर तुम्ही कुंडीत किंवा ग्रो-



बॅगमध्ये लावणार असाल, तर किमान १२ ते १५ इंच खोल कुंडी निवडा. ३. लागवडीची पद्धत अंतर: शेतात लागवड करताना दोन ओळींमध्ये २ फूट आणि दोन बटाट्यांमध्ये ७ ते ९ इंचाचे अंतर ठेवावे. खोली: मातीमध्ये सुमारे ३ ते ४ इंच खोल खड्डा किंवा सरी करा. बटाट्याचा कोंब आलेला भाग वरच्या बाजूला राहील अशा पद्धतीने बटाटा मातीत ठेवा आणि वरून मातीने झाकून टाका.

४. पाणी आणि सूर्यप्रकाश सूर्यप्रकाश: बटाट्याच्या रोपांना दररोज किमान ६ ते ८ तास भरपूर सूर्यप्रकाश मिळणे गरजेचे आहे. पाणी: लागवड केल्यावर लगेच हलके पाणी द्या. मातीत फक्त ओलावा असावा, दलदल करू नका. जास्त पाण्यामुळे बटाटे जमिनीतच सडू शकतात. माती सुकलेली दिसली कीच पाणी द्या. ५. रोपांची काळजी : लागवडीनंतर साधारण १० ते १५ दिवसांत कोंब मातीच्या वर येतात. मातीची भर देणे (महत्त्वाचा टप्पा): रोपे जशी ५-६ इंच मोठी होतील, तशी त्यांच्या मुळाशी बाजूची माती आणून ढीग करा (वरंबा तयार करा).

बटाटे उघडे राहून सूर्यप्रकाश पडल्यास ते हिरवे पडतात आणि विषारी होतात. त्यामुळे बटाटे नेहमी मातीने झाकलेले असावेत.६. काढणी : लागवडीनंतर साधारण ९० ते १२० दिवसांत (३ ते ४ महिन्यांत) बटाटे काढणीस तयार होतात. जेव्हा बटाट्याची झाडे पिवळी पडून सुकू लागतात, तेव्हा समजून जावे की बटाटे तयार आहेत. झाड सुकल्यानंतर पाणी देणे बंद करा आणि आठवड्याभराने हलक्या हाताने माती खणून बटाटे बाहेर काढा. बटाटे काढल्यानंतर लगेच धुवू नका. त्यांना २-३ दिवस कोरड्या आणि सावलीच्या ठिकाणी सुकवून घ्या, यामुळे त्यांची साठवणूक क्षमता वाढते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४१० : प्राग खगोलशास्त्रीय घडामोडींचा प्रथम उल्लेख करण्यात आला.
१४४६ : हंगुल वर्णमाला कोरिया मध्ये प्रकाशित झाली.
८०६ : प्रशियाने फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारले.
१८७४ : संयुक्त राष्ट्राच्या सदस्य देशांसोबत जगभरातील टपाल प्रणाली व्यतिरिक्त टपाल धोरणांचे समन्वय साधण्यासाठी संयुक्त राष्ट्राची एजन्सी असलेल्या युनिव्हर्सल पोस्टल युनियन ची स्थापना करण्यात आली.
१९४९ : सी राजगोपालचारी यांनी टेरीटोरियल आर्मी ची स्थापना केली.
१९६० : विद्याधर गोखले यांच्या 'पंडितराज जगन्नाथ' या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९६२ : युगांडाला (युनायटेड किंग्डमकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९८१ : फ्रान्समधे मृत्यूदंडाची शिक्षा रद्द करण्यात आली.
१९९३ : पशुवैद्यक डॉ. काजल तांबे यांचा जन्म.
२०१२ : पाकिस्तान देशातील शालेय विद्यार्थिनी व मानवाधिकार कार्यकर्ता मलाला युसुफ यांना तालिबान संघटनेच्या आतंकवाद्याने गोळी मारली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२४ : मुघल बादशहा शाहजहां आणि महारानी मुमताज महल यांचा धाकटा मुलगा मुहम्मद मुराद बख्श यांचा जन्मदिन.
१७५७ : चार्ल्स (दहावा) - फ्रान्सचा राजा (मृत्यू: ६ नोव्हेंबर १८३६)
१८२६ : प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार राजा लक्ष्मण सिंह यांचा जन्मदिन.
१८५० : फ्रेन्च रसायनशास्त्रज्ञ हेन्री लुईस ली चॅटॅलिअर यांचा जन्म. (मृत्यू: १७ सप्टेंबर १९३६)
१८५२ : एमिल फिशर - रासायनिक प्रक्रियेद्वारे शर्करा रेणूंच्या निर्मितीसाठी १९०२ मध्ये नोबेल पुरस्कार मिळालेले जर्मन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: १५ जुलै १९१९)
१८७६ : पंडित धर्मानंद कोसंबी - बौद्ध धर्माचे अभ्यासक (मृत्यू: ४ जून १९४७)
१८७७ : पण्डित गोपबंधूदास तथा 'उत्कलमणी' - ओरिसातील समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ते, स्वातंत्र्यसेनानी, कवी व लेखक (मृत्यू: १७ जून १९२८)
१८८९ : डेल्टा एअर लाईन्स चे सहसंस्थापक कॉलेट ई. वूल्मन यांचा जन्म. (मृत्यू: ११ सप्टेंबर १९६६)
१८९१ : उद्योजक, साहित्यिक व चित्रकार शंकरराव वासुदेव किर्लोस्कर यांचा जन्म. (मृत्यू: १ जानेवारी १९७५)
१८९७ : साली भारतीय कायदेपंडित, राजकारणी व तामिळनाडू राज्यातील प्रख्यात भारतीय स्वतंत्रता सेनानी व माजी मुख्यमंत्री मिंजूर भक्तवत्सलम यांचा जन्मदिन.
१९२२ : संशोधक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जैवभौतिक शास्त्रज्ञ गोपालसमुद्रम नारायण अय्यर रामचंद्रन तथा डॉ. जी. एन. रामचंद्रन यांचा जन्म. (मृत्यू: ७ एप्रिल २००१ - चेन्नई, तामिळनाडू)
१९२४ : भारतीय कवि आणि स्कॉलर थिरूनलूर करुणाकरन यांचा जन्म. (मृत्यू: ५ जुलै २००६)
१९२६ : जबरदस्त आवाजाने संवादफेक करून प्रेक्षकांना खूष करणारा हिन्दी चित्रपट अभिनेता कुलभूषण पंडित तथा राजकुमार ऊर्फ जानी यांचा जन्म. (मृत्यू: ३ जुलै १९९६)
१९२८ : ऑस्ट्रेलियाचा क्रिकेटपटू नील हार्वे यांचा जन्म.
१९३० : भारतीय इंग्रजी दिग्दर्शक आणि निर्माता अलेसदैर मिल्ने यांचा जन्म. (मृत्यू: ८ जानेवारी २०१३)
१९३५ : द फ्लाइंग सिख मिल्खा सिंग यांचा जन्म.
१९४५ : पद्मविभूषण पुरस्कार तसचं, संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय सरोद वादक उस्ताद अमजद अली खान यांचा जन्मदिन.
१९६६ : डेव्हिड कॅमरुन - इंग्लंडचे पंतप्रधान

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९२ : रावबहादूर गोपाळ हरी देशमुख ऊर्फ 'लोकहितवादी' - पत्रकार, समाजसुधारक व इतिहासकार. १८४८ ते १८५० या काळात 'प्रभाकर' या साप्ताहिकातून त्यांनी शतपत्रांचे लेखन केले. स्त्रियांचा कोंडमारा करणार्या रुढींवर त्यांनी प्रहार केला. त्यांनी ४३ मराठी ग्रंथ लिहिले. 'लक्ष्मीज्ञान' हा त्यांचा ग्रंथ हा अर्थशास्त्रावरील पहिला मराठी ग्रंथ आहे. (जन्म: १८ फेब्रुवारी १८२३)
१९१४ : विनायक कोंडदेव ओक - बालवाङ्मयकार. मुलांसाठी 'बालबोध' हे मासिक काढून त्यांनी चरित्रे, कविता, निबंध, शास्त्रीय विषयांवरील लेख इ. लेखन केले व मराठी बालवाङ्मयाचा पाया घातला. त्यांची सुमारे पन्नास पुस्तके प्रसिद्ध झाली. सहज व सोपी भाषा हे त्यांचे वैशिष्ट्य होते. (जन्म: २५ फेब्रुवारी १८४०)
१९५५ : गोविंदराव टेंबे - हार्मोनियम वादक, अभिनेते व संगीतकार, नाट्यसंगीताचे पहिले शिल्पकार, पहिल्या बोलपटाचे संगीत दिग्दर्शक, संगीत क्षेत्रातील पहिले सौंदर्य मीमांसक, संगीतिकांचे प्रवर्तक. 'अयोध्येचा राजा', 'अग्निकंकण', 'मायामच्छिंद्र' हे त्यांचे गाजलेले चित्रपट आहेत. हार्मोनियम या साथीच्या वाद्याला त्यांनी स्वतंत्र वाद्याची प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. (जन्म: ५ जून १८८१)
१९६३ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, बॅरिस्टर, राजकारणी आणि पाकिस्तान चळवळीचे समालोचक तसचं, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्य व पंजाब प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रमुख सैफुद्दीन किचलू यांचे निधन.
१९८७ : गुरू गोपीनाथ - कथकली नर्तक (जन्म: २४ जून १९०८)
१९९८ : जयवंत पाठारे - 'आह', 'अनाडी', 'अनुराधा', 'छाया', 'सत्यकाम', 'आनंद', 'अभिमान', 'गोलमाल' यांसारख्या गाजलेल्या चित्रपटांचे छायालेखक (जन्म: )



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत
शनिवार दि.१० ऑक्टोबर २०२६ ५



# दुष्काळ निवारणासाठी जालना जिल्ह्यात पाण्याचे नियोजन करा

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांचे प्रशासनाला निर्देश; पिकांचे पंचनामे आठवडाभरात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत दुष्काळ परिस्थिती जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर पाणी, चारा, पीक नुकसान, पीकविमा आणि रोजगार हमीच्या कामांचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश पशुसंवर्धन व पर्यावरणमंत्री तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी जालना जिल्हा प्रशासनाला दिले. उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्यासाठी टँकरच्या प्रत्येक फेरीचे जीपीएसद्वारे नियंत्रण, टँकर ज्या ठिकाणी उभा राहतो तेथे जलपुनर्भरणाची व्यवस्था आणि नदी-नाल्यांचे खोलीकरण, पुनर्जीवन व जलस्रोतांच्या बळकटीकरणावर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून बैठक घेतली. जालना जिल्ह्यातील पिकांचे पंचनामे, पीकविमा, धरणांतील पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, चारा, टँकर, रोजगार हमी योजना तसेच शहरी भागातील पाणीपुरवठ्याचा यावेळी आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जालना महापालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन उपलब्ध पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा काटेकोर वापर करावा. जिल्हाधिकाऱ्यांनी पिण्याचे पाणी, धरणांतील जलसाठा, जलस्रोतांचे बळकटीकरण, टँकर व्यवस्थापन आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी सर्वंकष मानक कार्यपद्धती (एसओपी) तयार करून सादर करावी.पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्ह्यातील ९५४ गावांमध्ये दुष्काळी परिस्थिती असून, सुमारे ६ लाख ७८ हजार हेक्टर क्षेत्र पंचनाम्याच्या कक्षेत आहे. आतापर्यंत सुमारे ६० टक्के गावांमध्ये पंचनामे पूर्ण झाले असून, क्षेत्राच्या तुलनेत सुमारे ५३ टक्के आणि खातेदारांच्या दृष्टीने सुमारे ६१ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. जालना जिल्ह्यात सुमारे ५ लाख ८१ हजार खातेदार असून, त्यापैकी ३ लाख ५६ हजार खातेदारांचे पंचनामे झाले आहेत. आठवडाभरात पंचनामे पूर्ण करून अहवाल शासनाकडे पाठविण्याचे आणि दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवावे. जिल्ह्यातील प्रमुख, मध्यम आणि लघु प्रकल्पांमध्ये पाणीसाठा अत्यल्प असून त्याचे योग्य नियोजन करण्याचे निर्देश पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.

''टँकर जिथे उभा राहतो, तिथे पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होतो. त्यामुळे टँकर भरण्याचे आणि वितरणाचे ठिकाण जीपीएसद्वारे निश्चित करा. ज्या ठिकाणी टँकरमधून पाणी दिले जाते, तिथे



जलपुनर्भरणाची व्यवस्था करून पाण्याचा एक थेंबही वाया जाणार नाही, याची दक्षता घ्या,'' असे निर्देश पंकजा मुंडे यांनी दिले.परवानगीशिवाय बोअरवेल घेण्यास कडक निर्बंध घालावेत. प्रत्येक टँकरला जीपीएस प्रणाली जोडून पाणी भरण्याच्या ठिकाणापासून वितरणापर्यंत त्याचे संनियंत्रण करावे. टँकर उभा राहणाऱ्या ठिकाणी जलतारा किंवा शोषखड्डा तयार करून सांडणारे पाणी भूजल पुनर्भरणासाठी वापरावे. जवळील विहीर अथवा हातपंपाच्या पुनर्भरणाचीही व्यवस्था करावी, असे निर्देश पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी दिले.

प्रत्येक तालुक्यात सुरू केलेल्या चारा साक्षरता अभियानातून मुरघास, हायड्रोपोनिक्स, अझोला आणि चाऱ्याच्या योग्य वापराची प्रात्यक्षिके शेतकऱ्यांना द्यावीत. गाळपेर क्षेत्राचा चारा उत्पादनासाठी उपयोग करावा. आवश्यकता भासल्यास गावपातळीवर चारा डेपो सुरू करून टॅग केलेल्या जनावरांच्या संख्येनुसार चारा आणि पाण्याचे नियोजन करावे, असे पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी निर्देशित केले. दुष्काळाच्या काळात रोजगार उपलब्ध करून देतानाच भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी रोजगार हमी योजनेतील कामांचा जलसंधारणाशी संबंध जोडण्याच्या सूचना पालकमंत्री मुंडे यांनी देण्यात आल्या. नदी-नाल्यांचे खोलीकरण, पुनर्जीवन, जलस्रोतांचे बळकटीकरण आणि गाळ काढण्याच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश पंकजा मुंडे यांनी दिले.''पुढील पावसाळ्यातही दुष्काळाची शक्यता गृहीत धरून आत्तापासूनच नियोजन करा. येणारा प्रत्येक पाण्याचा थेंब अडवला आणि जिरवला पाहिजे,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

दुर्लक्षित व गाळाने भरलेल्या विहिरींचे सर्वेक्षण करून त्यांची स्वच्छता व पुनर्बांधणी करण्याचेही त्यांनी यावेळी दिले. नैसर्गिक तसेच कृत्रिम तलावांचेही ऑडिट करून आगामी काळातील जलसाठ्यासाठी आवश्यक कामांचे नियोजन करण्यासही त्यांनी सांगितले. नगरपालिकांच्या पाणीपुरवठ्याचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. थकीत वीजबिलामुळे बंद असलेली खडकपूर्णा पाणीपुरवठा योजना सुरू करण्यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्यात येईल. पाणीटंचाईची तीव्र शक्यता असलेल्या गावांमध्ये रिचार्ज शाफ्ट, बंधारे आणि नाला खोलीकरणाच्या कामांना टप्प्याटप्प्याने निधी देण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

दुष्काळामुळे शेतकऱ्यांवर निर्माण होणारा मानसिक ताण लक्षात घेता गावागावांत शेतकरी समुपदेशन कार्यक्रम राबविण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. ग्रामसेवक, तलाठी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि सरपंच यांनी संवेदनशील कुटुंबांवर विशेष लक्ष ठेवावे, असे त्यांनी सांगितले.''दुष्काळाच्या परिस्थितीत केवळ पाणी आणि चाऱ्याची व्यवस्था पुरेशी नाही. शेतकऱ्यांना विश्वास देणे आणि त्यांच्याशी संवाद साधणेही तितकेच महत्त्वाचे आहे,'' असे पालकमंत्री मुंडे यांनी स्पष्ट केले.

पाणीटंचाईची तीव्रता असलेल्या गावांसाठी विविध संस्था, व्यक्ती, मंदिरे, रुग्णालये आणि शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून गाव दत्तक घेण्याची संकल्पना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी मांडली. सुमारे २५० गावांसाठी अशा स्वरूपाचे नियोजन करण्यात येत असून, दुष्काळग्रस्त कुटुंबांशी संवाद साधणे, आवश्यक मदत उपलब्ध करून देणे आणि दिवाळीच्या काळात सामाजिक आधार देण्याचा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.ही संकल्पना उत्तम असून आपण स्वतःही एक गाव दत्तक घेणार असल्याचे पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी सांगितले. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जालना जिल्ह्यातील शेतीचे पंचनाम्याची कार्यवाही वेगाने सुरू असून लवकरच ते पूर्ण करण्यात येतील. सर्व जिल्हा महिला व बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना प्रत्येक गावातील महिलांची बैठक घेऊन त्यांचे समुपदेशन करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. तसेच दुष्काळपरिस्थितीत मुलींच्या विवाहामध्ये येणाऱ्या अडचणी कमी करण्यासाठी सामूहिक विवाह सोहळे आयोजनाचा विचार सुरू आहे. तसेच शेतकरी संवाद सारखे उपक्रमही राबविण्यात येणार आहेत.

## एकल पालकत्व असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

तळेगाव । प्रतिनिधी

जि. प. प्राथमिक शाळा, तळेगाव येथील एकल पालकत्व असलेल्या तसेच आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना मैत्र मांदियाळी प्रतिष्ठानच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. आई किंवा वडिलांचे छत्र हरवलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना शैक्षणिक साहित्याची कमतरता भासू नये आणि कोणत्याही आर्थिक अडचणीमुळे त्यांची शैक्षणिक प्रगती थांबू नये, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमासाठी श्री. अजय किंगरे सर यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच श्रीमती गुरले मॅडम यांच्या पुढाकारातून गेल्या दोन-तीन वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. विशेष म्हणजे श्रीमती गुरले मॅडम यांची बदली इतर शाळेत झाल्यानंतरही त्यांनी तळेगाव येथील आपल्या जुन्या शाळेतील विद्यार्थ्यांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते कायम ठेवत यावर्षीही गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.



यावेळी विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, खोडरबर, पाऊच, स्टीलची पाण्याची बॉटल, दप्तर आदी शैक्षणिक साहित्य देण्यात आले. तसेच दसरा-दिवाळीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना ड्रेस व चॉकलेटचेही वाटप करण्यात आले. शैक्षणिक साहित्याबरोबरच सणाचा आनंद विद्यार्थ्यांसोबत वाटून घेतल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव उमटले.आर्थिक परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, त्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य सहज उपलब्ध व्हावे आणि त्यांनी आत्मविश्वासाने शिक्षण घेऊन उज्ज्वल भवितव्य घडवावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. गरजू विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून त्यांना मदतीचा हात देणे हीच खरी सामाजिक बांधिलकी असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लागावा, आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये आणि प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाची समान संधी मिळावी, या भावनेतून श्रीमती गुरले मॅडम दरवर्षी हा उपक्रम राबवत आहेत. त्यांच्या या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे विद्यार्थी, पालक आणि शाळा परिवारातून कौतुक होत आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या श्रीमती गुरले मॅडम आणि या उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे हे कार्य समाजासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.




## नाना पाटेकरांना आंदोलन कट्ट्यावर भावपूर्ण श्रद्धांजली!

बीड। प्रतिनिधी

दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना जगण्याचे बळ देणारे, जलसंधारणाच्या माध्यमातून नद्यांना पुनरुज्जीवन देणारे ज्येष्ठ अभिनेते तथा नाम फाऊंडेशनचे संस्थापक नाना पाटेकर यांच्या निधनाने बीड जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून त्यांनी जिल्ह्यात केलेल्या सामाजिक कार्याच्या आठवणींना उजाळा देत सामाजिक कार्यकर्त्यांनी आज शुक्रवारी (दि.९) बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आंदोलन कट्ट्यावर त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.दुष्काळ, शेतकरी आत्महत्या आणि ऊसतोड मजुरांच्या प्रश्नांसाठी ओळखल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यात नाना पाटेकर यांनी नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून संकटग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात दिला. जलसंधारणाच्या कामांमुळे हजारो हेक्टर शेतीला पाण्याचा आधार मिळाला, तर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदतीसोबतच जगण्याची नवी उमेद मिळाली. संकटाच्या काळात बळीराजाच्या पाठीशी ठामपणे उभे राहणाऱ्या नानांच्या कार्याचे स्मरण यावेळी करण्यात आले.

## कर्जमाफी फडणवीस सरकारची नौटंकी -विजय वडेट्टीवार

मंठा। प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी यावर्षी अभूतपूर्व दुष्काळी परिस्थितीचा सामना करीत असून, शासनाने तातडीने शेतकऱ्यांना भरीव मदत देण्याची गरज आहे. मात्र, फडणवीस सरकारकडे दुष्काळाचा सामना करण्याचे कोणतेही ठोस नियोजन दिसून येत नाही. कर्जमाफीच्या नावाखाली सरकारकडून केवळ नौटंकी सुरू असल्याचा आरोप विधिमंडळ गटनेते आ. विजय वडेट्टीवार यांनी केला. मंठा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विवेक घारे यांनी आ. विजय वडेट्टीवार आणि मंठा तालुक्यातील शेतकऱ्यांशी थेट संवाद घडवून आणला. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त शेतशिवारांना भेट देऊन पिकांची पाहणी केली. त्यानंतर मंठा तालुका काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात आयोजित संवाद बैठकीत शेतकऱ्यांनी आपल्या विविध समस्या व व्यथा आ. वडेट्टीवार यांच्यासमोर मांडल्या.

यावेळी माजी आमदार राजेश राठोड, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, विशाल धानुरे, राजेंद्र राख, अन्वर देशमुख, अब्दुल हाफीजभाई, निळकंठ वायाळ, राजेश खंदारे, शेख साजिदभाई यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शेतकऱ्यांनी दुष्काळ, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, बँकांकडून होणारी कथित पिळवणूक, पीक नुकसान, कर्जबाजारीपणा तसेच चारा छावण्यांची गरज यासह विविध प्रश्न उपस्थित केले. शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून घेत आ. वडेट्टीवार यांनी सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका केली. यंदाची परिस्थिती १९७२ च्या दुष्काळापेक्षाही गंभीर असल्याचे सांगत आ. वडेट्टीवार



म्हणाले की, महाराष्ट्रातील शेतकरी अत्यंत भयावह परिस्थितीतून जात आहे. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकऱ्यांसमोर कर्ज फेडण्यासह कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याचे मोठे संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत संकटग्रस्त शेतकऱ्यांना धीर देताना, शेतकऱ्यांनो जिद्द सोडू नका, रडू नका, लढण्यासाठी तयार रहा. संकट कितीही मोठे असले तरी खचून जाऊ नका. आपल्या कुटुंबाला वाऱ्यावर सोडू नका, असे आवाहन केले. केवळ घोषणा न करता तातडीने प्रत्यक्ष मदत करणे आवश्यक आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सरकारने तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवावे'अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा आणि प्रति हेक्टर एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली. यावेळी शरद बोराडे, कय्युमभाई कुरेशी, सिराजखान पठाण, शबाबभाई कुरेशी, संजय इंगळे, प्रकाश घुले, सारिकाताई वरणकर, सुरेश वाव्हळे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**
**मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज ४०५/२०२६**
**मार्फत ॲड. एस. आर. नागरगोजे**
**प्रल्हाद व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. प्रल्हाद पि. विठ्ठल गर्जे, वय ५६ वर्षे, धंदा शेती, २. हरिदास पि. विठ्ठल गर्जे, वय ५४ वर्षे, धंदा शेती, ३. भागवत पि. विठ्ठल गर्जे, वय ५२ वर्षे, धंदा शेती, ४. शकुंतला भ्र. शहादेव नागरगोजे, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, ५. सुशिला भ्र. कारभारी राख, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, अर्जदार क्र. १ ते ३ रा. महासांगवी ता. पाटोदा जि. बीड, अर्जदार क्र. ४ रा. चुंबळी, ता. पाटोदा जि. बीड, अर्जदार क्र. ५ रा. घेरला, ता. पाटोदा जि. बीड,

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी या न्यायालयात मयत विठ्ठल पि. आबा गर्जे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी विठ्ठल पि. आबा गर्जे यांचा मृत्यु दिनांक १३/०६/२०१७ रोजी महासांगवी ता. पाटोदा जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे मुले असून अर्जदार क्र. ४ व ५ हया मयताच्या विवाहित मुली आहेत. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत विठ्ठल पि. आबा गर्जे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८ ऑक्टोबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १७ नोव्हेंबर २०२६.

आदेशावरुन,
स्वाक्षरित
**सहाय्यक अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय, क. स्तर,
पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.

स्वाक्षरित
क. लिपींक

**जाहीर प्रगटन दुरुस्तीअर्ज...**
**मा. श्री. विजयकुमार बी. साळुंके, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
**(मार्फत विधिज्ञ ॲड. बी. एन. तावरे)**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५५२/२०२६**

अर्जदार :- १) द्वारकाबाई सुंदरलाल काळे, रा. तिप्पटवाडी, ता. जि. बीड, २) अभिमान्यु सुंदरलाल काळे, रा. सदर, ३) गणेश सुंदरलाल काळे, रा. सदर, ४) विज्रकला जालिंदर शिंदे, रा. आहेर वडगांव, ता. जि. बीड्. ५) चंद्रकला रगूनाथ सकुंडे, रा. (१) रामचंद्र पि. साहेबा सांगळे, २. प्रकाश पि. साहेबा सांगळे, ३) मंदाकिनी भ्र. हरीभाऊ आंधळे, ४) युवराज साहेबा सांगळे- मयत वारस ४.१) चंद्रकला भ्र. युवराज सांगळे, ४.२) सुनिल पि. युवराज सांगळे, ४.३) रेखा भ्र. शिवाजी वनवे, ४.४) निकिता पि. युवराज सांगळे, सर्व रा. धावज्याचीवाडी, ता. जि. बीड.

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी मयत नामे सुंदरलाल पि. संतराम काळे हे/हया दिनांक ३०/१२/२०२५ रोजी तिप्पटवाडी, ता. जि. बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले अर्जदार क्र. ४ ते ७ हया मयताच्या विवाहित मुली आहेत. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:-०४/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीखः- १६/११/२०२६.

आदेशावरुन,
स्वाक्षरित
**अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

स्वाक्षरित
क. लिपींक

## केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकाचा बीड जिल्ह्यात दौरा

### पावसाच्या खंडाने पिकांचे नुकसान; नद्या कोरड्या, विहिरी आटल्या

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथकाने गेवराई आणि बीड तालुक्यांतील विविध गावांना भेटी देऊन पिकांच्या नुकसानीचा आणि पाणीटंचाईचा आढावा घेतला. कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील या पथकाने शेतशिवारात जाऊन पिकांची स्थिती, जलस्रोतांची उपलब्धता आणि दुष्काळाचे परिणाम जाणून घेतले. पावसाच्या दीर्घ खंडामुळे शेतकऱ्यांनी केलेला खर्च आणि मेहनत वाया जाण्याची परिस्थिती या दौऱ्यात समोर आली.पथकात महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, नीती आयोगाचे सल्लागार डॉ. जसपाल सिंग आणि पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन अधिकारी डॉ. साक्षी भदौरिया यांचा समावेश होता. या दौऱ्यात राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे आणि गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित उपस्थित होते.



पथकाने गेवराई तालुक्यातील जातेगाव फाटा परिसरातील शेतांची पाहणी करून दौऱ्याला सुरुवात केली. येथील शेतशिवारातील पिकांची सद्यस्थिती जाणून घेत पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधला.गेवराई तालुक्यातील अर्धमसला आणि रानमळा परिसरात पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांच्या नुकसानीची माहिती घेतली. अर्धमसला येथील शेतकरी सुरेश बाबुराव नरवाडे यांच्या गट क्रमांक ९४ मधील १.४० हेक्टर क्षेत्रावरील कपाशी पिकाची, तर संतोष बाबुराव नरवाडे यांच्या गट क्रमांक ३३१ मधील ०.६७ हेक्टर क्षेत्रावरील ऊस पिकाची पाहणी करण्यात आली. गेवराई येथील शेतकरी मदन रामभाऊ मोटे यांच्या ०.८० हेक्टर क्षेत्रावरील कपाशी पिकाच्या नुकसानीचीही माहिती पथकाने घेतली.तुतीच्या पिकाची पाहणी करताना पाण्याअभावी वाढ खुंटल्याचे आणि अपेक्षित उत्पादन मिळण्यास अडचणी निर्माण झाल्याचे निदर्शनास आले. पावसातील दीर्घ खंडामुळे कपाशी, ऊस आणि तुती उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. पिकांसाठी केलेला हजारो रुपयांचा खर्च वाया जाण्याची शक्यता आहे. त्यातच करपलेल्या पिकांचा जनावरांसाठी चारा म्हणूनही उपयोग होत नसल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.शेतात घेतलेली मेहनत, पिकांसाठी केलेला खर्च आणि भरघोस उत्पन्नाची अपेक्षा यांवर पावसाच्या खंडामुळे पाणी फेरले गेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. गेवराई येथील शेतकरी मदन रामभाऊ मोटे यांच्या तूर आणि कपाशी पिकांची पाहणी करून पथकाने जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून पाऊस नसल्यामुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतली. विहिरीतील पाणी आटल्याने पिण्याच्या पाण्यासाठी स्वखर्चाने टँकर मागवावा लागत असल्याची व्यथा मोटे यांनी पथकासमोर मांडली. परिसरातील अन्य शेतकऱ्यांनीही ऊस पीक जळून गेल्याचे सांगितले. पिकांसाठी पाणी उपलब्ध नसणे, विहिरी आटणे आणि पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागणे, यामुळे शेतीसह दैनंदिन जीवनावरही गंभीर परिणाम होत असल्याचे या संवादातून स्पष्ट झाले.पथकाने बीड तालुक्यातील पारगाव जप्ती येथे शेतकरी सतीश सखाराम देवळे यांच्या गट क्रमांक ५० मधील ०.४० हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन पिकाची प्रत्यक्ष पाहणी केली. पावसाअभावी पिकाची झालेली दुरवस्था पाहून पथकाने शेतीतील नुकसानीची स्थिती जाणून घेतली.सोयाबीन पिकाच्या वाढीवर आणि उत्पादनाच्या अपेक्षेवर पावसाच्या खंडाचा परिणाम झाल्याचे या पाहणीतून दिसून आले. पिकासाठी केलेली मेहनत आणि खर्च यांचे अपेक्षित उत्पन्नात रूपांतर होण्याबाबत शेतकऱ्यांसमोर अनिश्चितता निर्माण झाली आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र



# जिल्ह्यात अवैध पाणी उपशावर प्रशासनाची धडक कारवाई
## वडवणीत गुन्हा तर धारूर पोलीस ठाण्यात 'एनसी' दाखल

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांवरून होत असलेल्या अवैध पाणी उपशाची प्रशासनाने अत्यंत गंभीर दखल घेतली आहे. उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प (वडवणी) आणि आरणवाडी साठवण तलाव (केज) येथे प्रशासनाने पोलिसांच्या मदतीने संयुक्त कारवाई केली. यावेळी अवैध मोटारी काढण्यास नकार देत शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्यांवर वडवणी येथे एफआयआर (ऋखठ) तर धारूर पोलीस ठाण्यात 'एनसी' दाखल करण्यात आली आहे.

दिनांक ०७ ऑक्टोबर रोजी जलसंपदा विभाग आणि पोलीस यांच्या संयुक्त पथकाने वडवणी तालुक्यातील उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पावर पाहणी केली. यावेळी काही शेतकरी विनापरवाना विद्युत मोटारी टाकून पाणी उपसा करत असल्याचे निदर्शनास आले. अधिकाऱ्यांनी त्यांना मोटारी काढून घेण्याच्या सूचना दिल्या असता, त्यांनी हुज्जत घालत शासकीय कामात अडथळा निर्माण केला.



याप्रकरणी दिनांक ०८ ऑक्टोबर रोजी वडवणी पोलीस ठाण्यात संबंधितांवर भारतीय न्याय संहिता (इछड) कलम २२१, २२३ (र), ३(५) आणि ३२४(४) अन्वये प्रथम माहिती अहवाल (ऋखठ) दाखल करण्यात आला आहे. दुसरी कारवाई केज तालुक्यातील आरणवाडी साठवण तलावावर दिनांक ०८ ऑक्टोबर रोजी करण्यात आली. लघु पाटबंधारे उपविभाग, केजचे अधिकारी आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त पाहणी केली असता, तेथेही विनापरवाना विद्युत मोटारींद्वारे पाणी उपसा सुरू असल्याचे आढळले. अधिकाऱ्यांनी मोटारी काढण्याचे निर्देश दिल्यानंतर संबंधितांनी अधिकाऱ्यांशी हुज्जत घातली. या प्रकाराची दखल घेत शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी संबंधित व्यक्तींविरुद्ध धारूर पोलीस ठाण्यात इछड कलम २२१ अन्वये 'एनसी' दाखल करण्यात आली आहे. त्यानंतर पोलिसांच्या मध्यस्थीने घटनास्थळावरून सर्व अवैध मोटारी व पाईपलाईन्स काढून घेण्यात आल्या असून, सध्या तेथे कोणतीही अवैध मोटार अस्तित्वात नाही. भविष्यात या किंवा इतर कोणत्याही प्रकल्पांमधून अशा प्रकारे विनापरवाना पाणी उपसा केल्यास संबंधितांवर महाराष्ट्र सिंचन कायदा व भारतीय न्याय संहितेअंतर्गत (इछड) कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. सार्वजनिक जलसंपत्तीच्या संरक्षणासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहनही प्रशासनाने केले आहे.




## गावातील पुढाऱ्यांनी जिल्हा परिषद शाळांचा विकास करावा –समाज प्रबोधनकार इंदुरीकर महाराज

माजलगाव । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या शाळा वाचल्या तर गोरगरीब मुलांच्या शिक्षणाची सोय होईल त्यामुळे गाव पुढाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांचा विकास करावा असे आवाहन समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांनी केले.

तालुक्यातील सुलतानपूर माळेवाडी येथील कै. सुभाषराव रामराव नरवडे यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त आयोजित हरिकीर्तनात बुधवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी ते बोलत होते. यावेळी आमदार प्रकाश दादा सोळंके, उपनगराध्यक्ष सहाल भैया चाऊस, माजी सभापती कल्याणराव आबूज, उपसभापती



श्रीहरी नाना मोरे ,सचिव हरिभाऊ सवणे व बाजार समितीचे सर्व सन्माननीय संचालक मंडळ उपस्थित होते. पुढे बोलताना इंदुरीकर महाराज म्हणाले की, आजच्या या युगात तरुण पिढी अत्यंत व्यसनाधीन झालेली आहे. त्यामुळे वडिलांना डोळ्या देखत स्वतःच्या मुलांची चिता बघण्याची वेळ आली आहे तर शेतकऱ्यांनी यंदा पडलेल्या दुष्काळामुळे खचून न जाता आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलण्या ऐवजी शेतीला जोडधंदा करावा असे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निमंत्रक तथा सभापती जयदत्त अण्णा नरवडे, अशोक नरवडे, अंकुश नरवडे, डॉ. ज्ञानेश्वर नरवडे, राधाकृष्ण नरवडे, संजय नरवडे, संतोष नरवडे, डॉ. कैलास नरवडे, डॉ. महेश नरवडे व समस्त नरवडे परिवाराच्या सर्व सदस्यांनी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

## शेतकऱ्याच्या भावानेच दिले सोयाबीनचे ढिग पेटवून

बर्दापूर । प्रतिनिधी

बर्दापूर पोलीस स्टेशन हद्दीतील गट नंबर ४७४,४७६ व ४७७ या गट जमिनीमधील दहा एकर वरील चार सख्ख्या भावांनी सोयाबीन पीक काढून ठेवलेले सोयाबीन सख्ख्या भावाने आर्थिक व्यवहारातून पेटवून दिले यात सख्ख्या तीन भावाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे याप्रकरणी बर्दापूर पोलीस स्टेशन येथे शेख गणी शेख जाफर यांनी सख्ख्या भावाविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

दिनांक ८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी सातच्या सुमारास



दुष्काळाच्या छायेमध्ये असलेल्या शेतकऱ्याने मोठ्या कष्टाने व मेहनतीने जनावरांसाठी व स्वतःसाठी रात्रीचा दिवस करून भविष्याच्या दृष्टीने दहा एकर सोयाबीन मध्ये चार भावांनी सोयाबीनचा पेरा केला होता पण यातच जमिनीच्या काही व्यवहारामध्ये विघ्न आल्याने सख्ख्या भावाने तीन सख्ख्या भावांचे सोयाबीनचे लाखो रुपयांचे नुकसान केले तसेच शेतामध्ये पाणी देण्यासाठी खरेदी केलेला नवीन कोरा स्पिंकलर सेट याचीही नुकसान झाले आहे या प्रकरणी बर्दापूर पोलीस स्टेशन येथे शेख गणेश शेख जाफर यांच्या तक्रारीवरून शेख कलीम शेख जाफर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे व पोलीस उपनिरीक्षक सतीश कुमार सारोळे यांच्या मार्गदर्शनाखाली बर्दापूर बीट प्रमुख श्री राम चेवले हे तपास करत आहेत.

## दुष्काळी पाहणी अन् पंचनाम्यांचे नाटक मदत लांबवण्यासाठीच भाई विष्णूपंत घोलप यांचा सरकारवर तीव्र हल्लाबोल

पाटोदा । प्रतिनिधी

केंद्राचे दुष्काळी पाहणी पथक नक्की कशाची पाहणी करणार? उडीद, मूग आणि बाजरीच्या पिकांचे वय निघून गेले असून, सोयाबीन शेताबाहेर काढण्यासाठी लागणाऱ्या खर्चाने शेतकरी वर्ग पूर्णपणे आर्थिक संकटात सापडला आहे. जलसंपदा विभागाकडे गल्लीपासून दिल्लीपर्यंत जलसाठ्याची सर्व माहिती एका क्षणात पोहोचलेली असताना, हे पाहणी दौरे आणि पंचनाम्यांचे नाटक केवळ शेतकऱ्यांना मदत उशिरा देण्यासाठीच चालवले जात आहे, असा घणाघाती आरोप बीड येथील भाई विष्णुपंत घोलप यांनी केला आहे.

पाटोदा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीपाची पिके पूर्णतः हातातून गेली आहेत. सोयाबीन काढणीचा खर्चही निघणे कठीण झाल्याने शेतकरी पुरता कोलमडला आहे. जलसाठ्यापासून ते पिकांच्या नुकसानीची सर्व खरी माहिती जलसंपदा आणि महसूल विभागाकडे आधीपासूनच उपलब्ध आहे. असे असतानाही केंद्र व राज्याचे पाहणी पथक पाठवून प्रत्यक्ष मदतीस विलंब केला जात आहे.

दुष्काळाचे गांभीर्य ओळखून शासनाने आज जनतेला व बळीराजाला काय दिले, तर काहीच नाही. केवळ आश्वासने आणि पाहणी दौऱ्यांचे नाटक सुरू आहे. सरकारच्या या उदासीन कारभारामुळे शेतकरी वर्गात प्रचंड असंतोष निर्माण झाला असून, या जनरोषाचा उद्रेक येणाऱ्या काळात राज्यकर्त्यांना नक्कीच दिसेल, असा इशारा भाई विष्णुपंत घोलप यांनी दिला आहे.

## दुष्काळात सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी; कोणीही धीर सोडू नका! - आ. धस

### शिरूर का. व पाटोदा तालुक्यांत दुष्काळ उपाययोजनासाठी बैठका; स्थलांतर रोखण्यासाठी मजुरांना काम देण्याचे आश्वासन

पाटोदा, शिरूर । प्रतिनिधी

पावसातील मोठ्या खंडामुळे आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतील दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्न यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. विशेषतः दुधाळ जनावरे जगवायची कशी, त्यांच्यासाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था कुठून करायची, असा गंभीर प्रश्न पशुपालकांसमोर उभा आहे. या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांच्या उपस्थितीत आष्टी तालुक्यानंतर शिरूर कासार व पाटोदा तालुक्यांत जिल्हा



परिषद गटनिहाय दुष्काळ निवारण आढावा बैठका घेण्यात आल्या. या बैठकांत शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेत तातडीच्या उपाययोजनांसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याची ग्वाही आमदार धस यांनी दिली.

शिरूर कासार तालुक्यातील पिंपळनेर, सावरगाव (च.), कान्होबाची वाडी त्यानंतर पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही, पाटोदा आणि कुसळंब येथे झालेल्या बैठकांमध्ये शेतकरी, फळबाग उत्पादक, पशुपालक आणि कार्यकर्त्यांनी दुष्काळाची विदारक परिस्थिती मांडली. पिकांचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी, जनावरांचा चारा आणि पशुधनासाठी पाण्याची व्यवस्था अशा विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली.

संकटात कोणीही हातबल होऊ नये; सरकार तुमच्या पाठीशी!- आ.सुरेश धस

या वेळी आमदार सुरेश धस म्हणाले, हे महायुतीचे सरकार तुमच्या पाठीशी आहे. या मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी म्हणून संकटाच्या काळात मी तुमच्यासोबत आहे. कोणीही हातबल होऊ नका, धीर सोडू नका. या कठीण परिस्थितीत गोरगरीब, दिनदलित, दुबळ्या आणि अडचणीत असलेल्या सर्वसामान्यांना मदतीचा हात द्या. दुष्काळामुळे मजुरांचे स्थलांतर होण्याची शक्यता लक्षात घेता, कार्यकर्त्यांनी गावोगावी जाऊन मजुरांना धीर द्यावा आणि स्थलांतरापासून परावृत्त करावे, असे आवाहन त्यांनी केले.

◀◀ पान ३ वर

## पवनचक्की कंपनीकडे २० लाखांची खंडणी मागून रस्ता खोडणाऱ्या ५ जणांवर पाटोदा पोलिसांत गुन्हा दाखल

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दासखेड फाटा ते थेला फाटा दरम्यान पवनचक्कीच्या (विंडमिल) कामात अडथळा आणून, जेसीबीच्या साहाय्याने सार्वजनिक रस्ता खोदून नुकसान केल्याप्रकरणी तसेच प्रत्येकी २० लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी ५ जणांविरोधात पाटोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सन पॉवर इंडिया व्हेंचर्स प्रा. लि. कंपनीच्या वतीने वटे गट क्र. ७७ मधील संपादित जमिनीवर पवनचक्की उभारणीचे काम सुरू आहे. फिर्यादी तुकाराम रामजी लटपटे (वय ४२, रा. बाबी, ता. आष्टी, ह. मु. पाटोदा) हे या कंपनीत जमीन अधिग्रहण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. दिनांक ५ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर २०२६ दरम्यान दासखेड फाटा ते थेला फाटा दरम्यानच्या पालखी मार्गावर आरोपींनी शासकीय/सार्वजनिक वहीवाटीच्या रस्त्यावर जेसीबीने खड्डे खोदून रस्त्याचे नुकसान केले.

कंपनीची वाहने अडवून, आम्हाला प्रत्येकी २० लाख रुपये दिल्याशिवाय रस्त्याने जाऊ देणार नाही, नाहीतर तुम्हा लोकांना दाखवतो, अशी धमकी आरोपींनी दिली. तसेच कॉलर पकडून शिवीगाळ करत शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

या आरोपींवर झाला गुन्हा दाखल:

१. महेंद्र गोविंद नगरगोजे २. नारायण उत्तम नगरगोजे ३. अशोक शामसुंदर नगरगोजे ४. किशोर भीमराव राख ५. शामसुंदर उत्तम नगरगोजे (सर्व रा. सोने सावरगाव, ता. पाटोदा, जि. बीड)

कायदेशीर कारवाई:

याप्रकरणी पाटोदा पोलीस ठाण्यात प्रथम खबर अहवाल (ऋळठ) क्र. ०३१०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (ब न स) २०२३ मधील कलम १८९(२), १२६(२), ३०८(२), ३२४(४), ३५२, ३५१(२) आणि सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ च्या कलम ३(१) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक (पी स इ) भगवान आदिनाथ भबाड करत आहेत.

## आष्टीकर महिलांसाठी नवरात्रीत प्रथमच रंगणार दांडिया महोत्सव!

### १५, १६ आणि १७ तारखेला तीन दिवस धमाल; केवळ महिलांनाच प्रवेश, दररोज आकर्षक बक्षिसांची संधी

आष्टी । प्रतिनिधी

शहरातील महिलांसाठी यंदाची नवरात्र खास ठरणार असून, शहरात प्रथमच तीन दिवसीय दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या उत्साहात महिलांना दांडियाचा आनंद घेता यावा, त्यांना आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करता यावे आणि महिलांसाठी मनोरंजनाचे एक स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे आष्टी शहरातील महिलांना यंदा आपल्या गावातच दांडियाचा रंगतदार अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

### दररोज महिलांना आकर्षक बक्षिसे

**या महोत्सवात सहभागी होणाऱ्या महिलांसाठी आकर्षक बक्षिसांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. महोत्सवाच्या प्रत्येक दिवशी लकी ड्रॉच्या माध्यमातून दहा महिलांची निवड करून त्यांना आकर्षक बक्षिसे दिली जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. त्यामुळे दांडियाच्या आनंदासोबतच बक्षिसे जिंकण्याची संधीही महिलांना मिळणार आहे.आष्टी शहरात प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या या महोत्सवामुळे महिलांना मनोरंजनाची एक वेगळी पर्वणी उपलब्ध होणार आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात येत आहे.**

नवरात्र म्हटले की देवीची आराधना, घटस्थापना, उपवास आणि दांडिया-गरब्याचा उत्साह असे चित्र पाहायला मिळते. विशेषतः मोठ्या शहरांमध्ये नवरात्रोत्सवादरम्यान दांडिया महोत्सवांची मोठी धूम असते. मात्र, आष्टीसारख्या शहरातील महिलांनाही अशा महोत्सवाचा आनंद आपल्या गावातच घेता यावा, या हेतूने यंदा प्रथमच या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे आष्टीकर महिलांमध्ये या महोत्सवाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

तीन दिवस दांडियाची रंगत!

हा दांडिया महोत्सव दि. १५, १६ आणि १७ रोजी आयोजित करण्यात येणार असून, दररोज सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत दांडियाचा कार्यक्रम रंगणार आहे.

◀◀ पान ३ वर

## तालुका स्टेडियमवर अतिक्रमणाचा डाव?

### नगर-बीड-जामखेड मार्गालगत तार कंपाउंड; खेळाडूंमध्ये संताप, प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील तालुका स्टेडियम हे परिसरातील शेकडो खेळाडूंसाठी हक्काचे क्रीडांगण असताना, स्टेडियमच्या जागेवरच अतिक्रमण करण्याचा डाव सुरू असल्याचा आरोप खेळाडूंमधून होत आहे. नगर-बीड-जामखेड मार्गालगत स्टेडियमच्या जागेत करण्यात आलेल्या तार कंपाउंडमुळे खेळाडूंमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, क्रीडांगणाची जागा कोणाच्याही घशात घालू देणार नाही, असा संतप्त सूर खेळाडूंमधून उमटत आहे.

तालुका स्टेडियमवर विविध क्रीडा स्पर्धा, मैदानी सराव तसेच युवकांचे नियमित खेळ सुरू असतात. परिसरातील अनेक खेळाडू आपल्या क्रीडा भवितव्यासाठी याच मैदानावर सराव करतात. मात्र, स्टेडियमच्या जागेत तार कंपाउंड करून काही भाग अडविण्यात आल्याने मैदानाच्या वापरावर मर्यादा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे क्रीडांगणाचे अस्तित्वच धोक्यात आणण्याचा हा प्रकार आहे का?, असा सवाल खेळाडूंमधून उपस्थित केला जात आहे.

प्रशासनाने हद्द निश्चित करावी

नगर-बीड-जामखेड मार्गालगत करण्यात आलेल्या तार कंपाउंडची तातडीने पाहणी करून संबंधित प्रशासनाने स्टेडियमच्या जागेची अधिकृत हद्द निश्चित करावी, अशी मागणी होत आहे. स्टेडियमच्या मालकी व हद्दीशी संबंधित कागदपत्रांची तपासणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी आणि जर कंपाउंड स्टेडियमच्या जागेत झाले असल्याचे आढळले, तर ते तातडीने हटवावे, अशी मागणी खेळाडूंनी केली आहे.

मैदानावर डोळा कोणाचा?

शहरातील उपलब्ध क्रीडांगणांची संख्या मर्यादित असताना, असलेल्या मैदानाची जागाही विविध कारणांनी कमी होत असेल

◀◀ पान ३ वर

## उत्कृष्ट अभिनेता आणि सामाजिक दायित्व जपणारा माणूस म्हणून नाना पाटेकर कायम स्मरणात राहतील –आ.सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

प्रसिद्ध अभिनेत्री तथा नटसम्राट स्व.नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी मनाला चटका लावणारी आहे.आपल्या अभिनयाने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारा,प्रतिकूल परिस्थितीवर मात करत कर्तृत्वाच्या बळावर उंची गाठणारा आणि सामाजिक बांधिलकी जपणारा एक संवेदनशील माणूस आपण गमावला असल्याची भावना आ.प्रकाश सोळंके यांनी व्यक्त करत नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शहरातील जुना मोढ्यांतील गणपती मंदिरात स्व.नाना पाटेकर यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेचे दि ०९ ऑक्टोबर शुक्रवार रोजी सकाळी ११:०० वाजता आयोजित करण्यात आली होती.यावेळी श्रंध्दाजंली सभेत बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की नानांशी फोनद्वारे अनेकदा संवाद साधण्याचा योग आला.या संवादांमध्ये सामाजिक कार्याविषयी नेहमीच चर्चा व्हायची. त्यांच्या बोलण्यातून समाजाप्रती असलेली तळमळ आणि काम करण्याची धडपड जाणवायची.नाम फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी आपल्या मतदारसंघात नदी खोलीकरण आणि गाळ काढण्याचे काम केले. जलसंधारणाच्या या कामांमुळे पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी मोलाचे योगदान मिळाले.आपल्या भागातील या कार्याची आठवण कायम मनात राहील.पडद्यावर आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे आणि पडद्याबाहेर सामाजिक कार्यातून माणुसकीचा धर्म जपणारे नाना पाटेकर यांच्या स्मृती सदैव प्रेरणा देत राहतील अशी भावना यावेळी आ.प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केली.यावेळी सर्व पक्षांचे जेष्ठ नेते, पदाधिकारी उपस्थीत होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26